### पुण्यातील बॅनरवरुन अण्णा हजारेंची नाराजी

**राळेगणसिद्धि, दि. १७ वृत्तसंस्था**

समाजसेवक अण्णा हजारे यांनाही लक्ष्य करणारे फ्लेक्स पुण्यातील पाषाण परिसरात झळकले आहेत. अण्णा आता तरी उठा....कुंभकर्णसुद्धा गाढ झोपेतून रावणासाठी आणि लंकेसाठी उठला होता... तुम्ही आपल्या देशासाठी आता तरी उठा..... होय मतांची चोरी आहे, अशा आशयाचे हे फ्लेक्स होते. त्यावरती अण्णांनी नाराजी व्यक्त करत प्रतिक्रिया दिली आहे. मी दहा कायदे आणले, मात्र ९० वर्षांनंतर देखील मी करत राहावं आणि तुम्ही झोपून राहावं ही अपेक्षा चुकीची आहे. अण्णांनी जे केलं ते आपण करावं असं तरुण युवकांना वाटलं पाहिजे, देशाचे नागरिक आहेत तर आपलं काही कर्तव्य आहे की नाही. काल स्वतंत्र दिवस साजरा केला, नुसता तिरंगा हातात घेऊन होणार नाही, बोट दाखवून काहीही होणार नाही. युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे, ही जागी झाली तर उद्याच भविष्य दूर नाही. मात्र एवढे वर्ष लढून कायदे करून जेव्हा कानावर येतं अण्णांनी जाग झालं पाहिजे तेव्हा वाईट वाटतं, असे अण्णा म्हणाले.


मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:७८ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


# हा भारताच्या संविधानाचा अपमान...

## राहुल गांधींच्या मतचोरीच्या आरोपांनंतर निवडणूक आयोगाचे उत्तर

**नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था**

**लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर टीका करत मतदान प्रक्रियेत घोळ झाल्याचा गंभीर आरोप काही दिवसांपूर्वी केला होता. त्यांच्या आरोपामुळे देशभरात एकच खळबळ उडाली होती. मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी काही पुराव्यांचं सादरीकरण केलं होतं. राहुल गांधींच्या मत चोरीच्या आरोपांना निवडणूक आयोगाने उत्तर देत काही नेते मतदारांची दिशाभूल करत असल्याचं म्हटलं.**

तसेच निवडणूक आयोग अशा खोट्या आरोपांना घाबरत नाही नाही, असंही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे यावेळी म्हणाले आहेत.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, "सर्वात आधी निवडणूक आयोग मतदारांना एक संदेश देऊ इच्छित आहे. भारताच्या संविधानानुसार भारताचा प्रत्येक नागरिक आणि ज्याने १८ वर्ष पूर्ण केलं आहे त्या व्यक्तीने मतदान केलं पाहिजे. तुम्हाला सर्वांना माहिती आहे की प्रत्येक राजकीय पक्षांचा जन्म निवडणूक आयोगातील नोंदणी केल्यानंतरच होतो. मग असं असताना निवडणूक आयोग सर्वच राजकीय पक्षांबरोबर भेदभाव कसा करेल? निवडणूक आयोगासाठी ना कोणी विरोधीपक्ष, ना कोणी सत्ताधारी, आमच्यासाठी सर्व समान आहेत. आमच्यासाठी सर्व पक्ष एकसमान आहेत. निवडणूक आयोग राजकीय पक्षांमध्ये भेदभाव करत नाही", असं ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं.

"कोणत्याही राजकीय पक्षाचं कोणीही असो. मात्र, निवडणूक आयोग आपल्या संविधानिक कर्तव्यापासून मागे हटणार नाही. गेल्या दोन दशकांपासून जवळपास मतदार याद्यांमधील त्रुटी सोडवण्यासाठी मागणी करण्यात आलेली होती. ती मागणी पूर्ण करण्यासाठी एसआयआर प्रक्रियेला सुरूवात



करण्यात आलेली आहे. निवडणूक आयोग सर्व राजकीय पक्षांना आवाहन करत आहे की १५ दिवसांत मतदार यादीतील फेरतपासणी करण्यासंदर्भातील काही त्रुटी असतील तर सांगा. मात्र, काही राजकीय पक्षांकडून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मतदार याद्यातील त्रुटी दूर करण्यासाठीच एसआयआर प्रक्रियेची सुरूवात करण्यात आलेली आहे. बिहारमधील ७ करोड पेक्षा जास्त मतदार निवडणूक आयोगाच्या पाठिशी उभे आहेत. असं असताना आयोगावर कोणाता एखादा प्रश्न कसा निर्माण होऊ शकतो?", असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

दरम्यान, राहुल गांधींच्या मतदान चोरीच्या आरोपांना उत्तर देताना निवडणूक आयोगाने राहुल गांधींवर जोरदार हल्लाबोल केला. काही नेते मतदारांची दिशाभूल करत असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. मात्र, आम्ही आमच्या कर्तव्यापासून मागे हटणार नाही. मतचोरी सारख्या चुकीच्या शब्दाचा वापर केला गेला. पण जनतेला भ्रमित करण्याचा हा अयशस्वी प्रयत्न आहे. तसेच हा भारतीय संविधानाचा अपमान नाही तर काय आहे?", असा सवालही निवडणूक आयोगाने केला.

पुढे बोलताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, "निवडणूक अधिकाऱ्यांनी निकाल जाहीर केल्यानंतर कायद्यात अशी तरतूद आहे की ४५ दिवसांत राजकीय पक्ष सर्वोच्च न्यायालयात निवडणुकीला आव्हान देऊ शकतात. याचिका दाखल करू शकतात. मात्र, ४५ दिवसांच्या कालावधीनंतर आता अशा प्रकारचे निराधार आरोप करणं योग्य नाही. मात्र, अशा प्रकारचे निराधार आरोप करण्यामागील हेतू आम्ही समजतो", असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे.

"काहींनी वेगवेगळे आरोप केले. त्यानंतर आम्ही पुरावे मागितले तर कोणतंही उत्तर देण्यात आलं नाही. मात्र, निवडणूक आयोग अशा खोट्या आरोपांना घाबरत नाही. निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून मतदारांना लक्ष्य करत अशा प्रकारचं राजकारण केलं जात आहे. मात्र, निवडणूक आयोग स्पष्ट करू इच्छित आहे की गरीब, श्रीमंत किंवा तरुण आणि महिला या सर्व मतदारांबरोबर निवडणूक आयोग दगडासारखा उभा आहे", असं निवडणूक आयोगाने म्हटलं.

अग्रलेख

## खरीखरी

## पदयात्रेची मात्रा

आज बिहारमध्ये तेथील सत्तारूढ पक्षाच्या विरोधात अनेक पक्षांना सोबत घेऊन राहुल गांधी यांनी तेजस्वी रणशिंग फुंकले. जे शब्द राहुल गांधींनी वापरले आहेत ते शब्द न्यायालयाला म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाला पसंत नाहीत आणि निवडणूक आयोगाला तर विरोधीच वाटतात. विरोधी पक्ष म्हणून आजच्या सत्तारूढ पक्षाने आधुनिक गांधीबाबांना पुढे करून जे जे महा आरोप केले होते. त्या सर्व आरोपांचे या अकरा वर्षात अक्षरशः बारा वाजलेले आहेत म्हणजेच हे रु.डीसारखे झाले रु.डी एखाद्यावर आरोप करते, त्याला तुरुंगात टाकते पण त्या विरुद्धच्या खटला खाटल्यावरच संपतो. आता राहुल गांधी यांनी जे आरोप केलेले आहेत ते खरे नसतील असे आम्ही म्हणून टाकतो. मग खरे काय आहे हा प्रश्न आहे. निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षावर आरोप न करता त्याबद्दल सांगितले पाहिजे. निवडणूक आयोगाचे काम राजकीय निवेदने करण्याचे नाही पण सध्या सर्वच जण आपल्या संवैधानिक आणि राजकीय मर्यादा विसरले दिसत आहेत की काय असा संशय येण्यास जागा आहे. राहुल गांधी सध्या भलतेच जोशात आहेत ते पूर्वीच्या विरोधी पक्ष नेत्याप्रमाणे नाहीत. याचे कारण असे असावे की आताचे सरकार पूर्वीच्या सरकार सारखे नाही कारण १९४७ पासून चा जर इतिहास बघितला तर विरोधी पक्षातील अनेक दिग्गज नेते काँग्रेसच्या प्रचंड बहुमतासमोर कधीही झुकले नाहीत. पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारखे अत्यंत लोकप्रिय नेते पंतप्रधान पदावर होते त्यांची जादू सुद्धा १९६२ साली झालेल्या चिनी आक्रमणा नंतर कमी झालेली होती. तेव्हा आपला पराभव होत आहे असे दिसत असतानाही नेहरूंनी लोकसभेचे अधिवेशन बोलावले, सर्व आरोपांना उत्तरे दिली. त्यानंतर जी जी युद्ध झाली ती फक्त पाकिस्तान विरुद्ध होती विशेष म्हणजे सर्व युद्धामध्ये आपण या पाकड्यांना चारी मुंड्या चीत केलेले आहे. नुकत्याच संपलेल्या ऑपरेशन सिंदूर मध्येही आपण पाकिस्तानला दाबूनच टाकले. एवढा पराक्रम गाजवून आपल्या सैन्याने देशाची मान उंचवली त्याबद्दल देशाला विश्वासात घेतले असते तर अधिक बरे झाले असते. युद्धाच्या दिवसात विरोधी पक्षनेते आणि विरोधी पक्षांनीही सरकारला बिनशर्त पाठिंबा दिला होता. १९७१ साली अटल बिहारी वाजपेयी यांनी सुद्धा सरकारला पूर्ण पाठिंबा दर्शविला होता एकूणच काय जर परस्पर सामंजस्य असले, तर विरोधी पक्षाच्या मनातील विखार कमी होऊ शकतो. विरोधाला विरोधाने तोंड देण्याएवजी सरकारने संयमाने उत्तरे दिली असती तर कितीतरी प्रश्न आपोआपच सुटले असते. आता राहुल गांधी यांच्या मतचोरी बद्दलच्या ताज्या वक्तव्यांचा किंवा आरोपांचा जबाब निवडणूक आयोगाने द्यायला पाहिजे होता. त्याएवजी निवडणूक आयोगाचे अघोषित प्रवक्ते बनून विरोधी पक्षांच्या आरोपाचे उत्तर देण्याची इतरांना काहीच गरज नव्हती. निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन जे निवेदन दिले त्यामध्ये विरोधी पक्षांच्या आरोपांचे उत्तर नाही, उत्तर नाही म्हणजे विरोधी पक्षांनी उपस्थित केलेले आरोप एक तर खरे नसावेत किंवा ते दुर्लक्षित करण्याजोगे असावेत. मात्र दुर्लक्ष करण्याजोगे असते तर आज बिहार मधील मत अधिकार यात्रेला हजारो लोक उपस्थित होते. ही परिस्थिती का निर्माण झाली हा विचार सर्वसामान्यांच्या मनात सहज येऊ शकतो. अशा परिस्थितीमध्ये निवडणूक आयोगाबद्दल शंका कुशंका निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे असे बरेच लोकांना वाटते. जो निवडणूक आयोग वगळलेल्या मतदारांची नावे देण्यास ठाम नकार देत होता त्या निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने ४८ तासांच्या आत सर्व नावे जाहीर करण्याचा आदेश दिला. हा आदेश देण्यापूर्वी निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा संधी दिली होती पण आयोग स्वतःच्या भूमिकेवरती ठाम होता. आपण स्वायत्त आहोत आणि काहीही करू शकतो अशा अविर्भावात होता आज बहुतेक सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याचा शेवटचा दिवस होता. आयोगाने काय केले हे आम्हाला ठाऊक नाही पण आयोगाच्या अनेक प्रयोगांपैकी बिहारचा प्रयोग वादात अडकलेला आहे. या वादावादी पेक्षा विचारलेल्या खऱ्या खोट्या प्रश्नांची उत्तरे दिली असती तर सर्वोच्च न्यायालयासमोर शुक्रवारी झालेली निवडणूक आयोगाची नाचक्की नक्कीच टाळता आली असती. आता पदयात्रा सुरू झाली आहे त्यातून कोणती मात्रा निघेल हे कोणालाच ठाऊक नाही. मात्र निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांना समाधानकारक उत्तरे द्यावीत एवढीच विरोधी पक्षांची मागणी आहे. तेवढे झाले तरी तो आपल्या देशातील लोकशाहीला बळकट ठरणारा बळकट करणारा प्रयोग ठरेल.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


## कोल्हापूर सर्किट बेंचचे दिमाखात उद्घाटन



**कोल्हापूर, दि. १७ प्रतिनिधी**


कोल्हापूरसह सहा जिल्ह्यांनी उराशी जपलेले उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचचे स्वप्न आज रोजी साकार झाले. सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या हस्ते कोल्हापूर सर्किट बेंचचे उद्घाटन झाले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा. शाहू महाराज, पुढारीचे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, खा. धैर्यशील माने, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, सहाही जिल्ह्यातील मान्यवर आदी यावेळी प्रमुख उपस्थित होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर, छत्रपती संभाजी नगर व गोवा या खंडपीठानंतर राज्यात सोमवारपासून कोल्हापूर सर्किट बेंच येथे न्यायदानाचा शुभारंभ होणार आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांतील नागरिकांचा न्यायदानाच्या प्रक्रियेतील सुलभता यामुळे प्राप्त होणार आहे. सर्किट बेंच उद्घाटनासाठी कोल्हापुरात मोठा उत्साह दिसून आला. शनिवारी जेव्हा कोल्हापुरात सरन्यायाधीशांचे आगमन झाले तेव्हा रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेल्या कोल्हापुरकरांनी त्यांच्या ताफ्यावर फुलांचा वर्षाव करत त्यांचे स्वागत केले होते. भूषण गवई यांना न्यायालयाच्या प्रांगणात आल्यानंतर त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. गार्ड ऑफ देण्यात आल्यानंतर सर्किट बेंचचे उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी कोल्हापूरसह सहा जिल्ह्यातील सामान्य हजारो नागरिक सोहळ्याचे साक्षीदार झाले. याच ठिकाणी उद्यापासूनच कोल्हापूर सर्किट बेंच कामकाजाला प्रारंभ होणार आहे. यासाठी प्रशासकीय स्टाफ आणि न्यायमूर्तींची सुद्धा नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, सर्किट बेंचसाठी ९ हेक्टर १८ आर जागा शेंडा पार्कमध्ये प्रस्तावित करण्यात आली आहे. या जागेसाठी शासनाची मान्यता मिळण्यासाठी कार्यवाही सुरु असल्याची माहिती जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी सरन्यायाधीश भूषण गवई कोल्हापूरमध्ये पोहोचताच दिली. या सर्किट बेंचचा लाभ कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना होणार आहे. यापूर्वी या जिल्ह्यांतील नागरिकांना आपली प्रकरणे मुंबईत नेऊन लढावी लागत होती, ज्यासाठी वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा खर्च होत होता. आता ही प्रकरणे कोल्हापुरातच चालवली जाणार असल्याने सर्वांसाठी मोठी सोय होणार आहे.

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती पदाची उमेदवारी जाहीर

**नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था**

संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू असतानाच जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं होतं. जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर नवे उपराष्ट्रपती कोण होणार? याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत. दरम्यान, या पार्श्वभूमीवर दिल्लीत घडामोडींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. उपराष्ट्रपती पदासाठी आज एनडीएच्या उमेदवाराची दिल्लीत घोषणा करण्यात आली आहे.



भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना एनडीएचा उमेदवार निवडण्याचा अधिकार दिला होता. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या संसदीय मंडळाची आज दिल्लीत महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एनडीएच्या उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एनडीएकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

राधाकृष्णन हे गेल्या तीन दशकांपासून भाजपाचे सक्रीय सदस्य आहेत. ते भाजपाच्या तिकीटावर दोन वेळा तमिळनाडूच्या कोईंबतूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार म्हणून निवडून आले आहेत. तसेच त्यांनी काही वर्षे तमिळनाडू भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पाहिलं आहे. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत भाजपाने त्यांना लोकसभेचं तिकीट दिलं होतं. मात्र, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींची लाट असूनही ते पराभूत झाले होते. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती केली होती. त्यानंतर दीड वर्षांनी त्यांच्याकडे महाराष्ट्रासारख्या बलाढ्य राज्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती.

## दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रगतीच्या दिशेने



**नवी मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्र फडणवीस जी यांनी आज दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबईला भेट देऊन प्रकल्पाची सविस्तर पाहणी केली.

या दौऱ्यात त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन कामाच्या प्रगतीचा तपशीलवार आढावा घेतला.

प्रकल्प वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावा यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस जी, उपमुख्यमंत्री मा. श्री एकनाथ शिंदे जी, मंत्री मा. गणेश नाईक जी, आमदार मा. श्री. महेश बालदी जी, आमदार आमदार मा. प्रशांत ठाकूर जी, आमदार मा. मंदा म्हात्रे जी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

राज्याच्या प्रगतीला वेग देणारा, तसेच रोजगार व विकासाच्या संधी निर्माण करणारा हा महत्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित होण्यासाठी शासन पूर्णपणे कटिबद्ध आहे, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## जगदीप धनखड यांच्यानंतर माजी निवडणूक आयुक्त राजीव कुमारही 'बेपत्ता'? - संजय राऊत

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी अचानक राजीनामा दिला. प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिल्याचे त्यांनी सांगितले गेले. अद्याप नवीन उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवारही जाहीर झालेले नाहीत, तसेच राजीनामा दिल्यापासून धनखड सार्वजनिक मंचावर दिसले नाहीत. तसेच आता माजी मुख्य निवडणूक आयुक्तही बेपत्ता झाले असल्याचे शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत म्हणाले आहेत. आज माध्यमांशी बोलत असताना ते म्हणाले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राजीव कुमार मुख्य निवडणूक आयुक्त होते. ज्यांच्या मदतीने नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी निवडणूक जिंकली, ते राजीव कुमार कुठे आहेत?



माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड बेपत्ता झाले तसे तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार कुठे आहेत? हा माझा प्रश्न आहे, असे संजय राऊत म्हणाले. "राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर प्रश्न उपस्थित करायला सुरुवात केल्यानंतर त्याचे उत्तर राजीव कुमार यांनी द्यायला हवे होते. कारण त्यांच्याकडेच आयोगाची जबाबदारी होती", असेही राऊत म्हणाले.

ज्यांनी शिवसेना हे पक्ष नाव आणि धनुष्य-बाण हे चिन्ह घटनेविरोधाच जाऊन शिंदे गटाला दिले. त्यात किती कोटींचा व्यवहार झाला, हे सुद्धा मी सांगितले होते. ते राजीव कुमार याक्षणी कुठे आहेत? हा माझा प्रश्न आहे. सोशल मीडियावर हा प्रश्न मी उपस्थित केला असून त्यावर दिल्लीच्या वर्तुळातही चर्चा सुरू आहे, असेही संजय राऊत यावेळी म्हणाले.

"ज्याप्रमाणे माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड दिसत नाहीत, तसे मत चोरी प्रकरणात राहुल गांधी आणि विरोधकांनी हल्ला सुरू केल्यानंतर तत्कालीन आयुक्तांना लोकांशी बोलण्यापासून किंवा त्यांचे मत व्यक्त करण्यापासून थांबविण्यात आले आहे. कदाचित त्यांना दिल्लीमध्येही आता ठेवलेले नाही", असा खळबळजनक दावा संजय राऊत यांनी केला.

## मते मिळणार नाहीत अशी १० हजार नावे काढून टाकण्याची आपल्याला ऑफर- बच्चू कडूंचा दावा

**मुंबई, दि. १७ प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून विरोधकांकडून मत चोरीचा मुद्द्यावरून गंभीर आरोप केले जात आहेत. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर टीका करत मतदान याद्यांमध्ये घोळ झाल्याचा गंभीर आरोप केला होता. तसेच शरद पवारांनी काही दिवसांपूर्वी आपल्याला विधानसभेआधी दोन व्यक्तींनी १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी दिली होती असा गौप्यस्फोट केला होता. यादरम्यान आता प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी ज्यांची मते मिळणार नाहीत अशी १० हजार नावे काढून टाकण्याची आपल्याला ऑफर होती, असे कडू म्हणाले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या आधी मिळालेल्या ऑफरबद्दल बोलताना बच्चू कडू म्हणाले की, विधानसभेच्या आगोदर मला १० हजार लोकांची यादी मागितली होती, की ज्यांचे तुम्हाला मतदान भेटत नाही ती नावे आम्ही उडवून टाकतो. माझ्याजवळ व्यवस्थित पुरावे आल्यानंतर मी जाहीर करेन. त्यांनी असं म्हटलं होतं की आपले लोकं कसे निवडून आणायचे तर जे तुम्हाला न भेटणारं मतदान आहे ती यादी काढा, ते १० हजार कमी करून दुसरे घालू, अशी ऑफर होती. वेळ आली तर याचे पुरावा देऊ, असे बच्चू कडू म्हणाले.

ऑफर कोणी दिली होती? सरकारमधील लोक होते की कोणी त्रयस्थ पार्टी होती? या प्रश्नावर सगळं हाती येऊद्या मी सगळं सांगतो. सरकारमधीलच लोक कमी करू शकतात ना, आपल्यात काय ताकत आहे? असे उत्तर बच्चू कडू यांनी दिले.

तसेच आपल्याला ऑफर स्वीकारणं बरं वाटलं नाही. कारण आम्हाला पूर्ण खात्री होती की आपलं जमतंयच (निवडून येतोय), असंही बच्चू कडू यांनी हसत स्पष्ट केलं.

यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी देखील मोठा गौप्यस्फोट केला होता. विधानसभेच्या निवडणुकी आधी दोन व्यक्तींनी १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी दिली होती, असं विधान शरद पवार यांनी केलं होतं.

## एमआयडीसीकडून जमिनी घेऊन काम करणार नाही त्याला नोटीस देणार आणि जमिनी ताब्यात घेणार - अजित पवार

**जळगाव, दि. १७ प्रतिनिधी**

एमआयडीसीकडून जमिनी घेऊन काम करणार नाही त्याला नोटीस देऊन त्यांच्या जमिनी ताब्यात घेणार आहोत, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. जळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा समृद्ध खान्देश संकल्प आणि पक्ष प्रवेश मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. आम्ही पायाभूत सुविधा देण्याची काम करतो आहे. आम्ही अनेक चढउतार बघितले आहेत. अर्थखाते आपल्याकडे आहे. त्यामुळे कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही. इतक्या वर्षात एमआयडीसीकडून जमीन घेतली आणि काम करणार नाही त्यांना नोटीस देऊन त्यांच्या जमिनी ताब्यात घेणार आहोत, असा इशारा अजित पवारांनी दिला. तसेच जो तीन महिन्यांत उद्योग सुरू करेल त्याला आम्ही जमिनी देणार आहोत. उद्योगसाठी कमी दरात वीज देण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, असे देखील त्यांनी यावेळी म्हटले. या मेळाव्यात आदिवासी नेत्या प्रतिभा शिंदे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

## भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावुन त्याचे रेकॉर्डींग सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी राईसमिलर्सची

### 15 दिवसांचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना सादर करणे अत्यावश्यक

**देसाईगंज, दि. १७ प्रतिनिधी**

शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान स्थानिक राईसमिलर्सना भरडाई करीता देण्यात येताना शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. ७.७ नुसार अटी व शर्थिच्या अधिन राहुन देण्यात येते.यात भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून त्याचे रेकॉर्डींग पेनड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संबंधित राईसमिलर्सची असुन दर १५ दिवसांनी सदर चित्रीकरण पेनड्राईव्ह मध्ये कॉपी करून ठेवणे आवश्यक आहे.तसेच सदर १५ दिवसाचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असतांना जिल्हा पुरवठा अधिकारी यांना माहितीच्या अधिकारात माहिती मागीतली असता सदर चित्रीकरण उपलब्ध नसल्याची गंभीर तेवढीच धक्कादायक माहिती चव्हाट्यावर आली असल्याने एकुणच पुरवठा विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह लावल्या जाऊ लागले आहेत.

अतिदुर्गम, आदिवासीबहुल नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान स्थानिक राईसमिलर्सना भरडाई करीता देतांना यात अनियमितता होऊ नये करीता राज्याच्या अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक:-धानभ-१३२४/प्र.क्र १६७/नापु.२९ दि.२२ नोव्हेंबर २०२४ च्या मुद्दा क्रमांक ७ अनुसार धान भरडाई करीता देताना गिरणीधारकांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.यात मुद्दा क्रमांक ७.७ नुसार भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून त्याचे रेकॉर्डींग पेनड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक करण्यात आले आहे.तसेच दर १५ दिवसांनी सदर चित्रीकरण पेनड्राईव्ह मध्ये कॉपी करून सदर १५ दिवसाचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी यांना जतन करून ठेवण्यासाठी सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

तसेच शासनाकडून सदर चित्रीकरणाची मागणी करण्यात आल्यास तसेच तपासणीच्यावेळी सदर चित्रीकरणाचा पेनड्राईव्ह उपलब्ध करून देणे बंधनकारक असून असे चित्रीकरण न केल्यास सदर भरडाई केंद्र रद्द करण्यास पात्र राहिल,असे स्पष्ट सुचित करण्यात आले आहे.असे असतांना जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकारात माहिती मागण्यात आली असता जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे संबंधित एकाही राईसमिलर्सने भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून रेकॉर्डींग केली नसल्याची गंभीर बाब चव्हाट्यावर आली आहे.असे असतांना जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासन परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ७.७ नुसार एकाही राईसमिलर्सवर कारवाई देखिल केली नसल्यानेच सिएमआर मिलींग मधील प्रचंड गैरव्यवहार चव्हाट्यावर येऊ लागले आहे.यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय व राईसमिलर्स संगनमताने शासनाला कोट्यावधी रुपयाने चुना लावण्यात यशस्वी होत आहेत.करीता या गंभीर तेवढ्याच धक्कादायक प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.याबाबत वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# ओझर येथे माजी सैनिकांतर्फे स्वातंत्र्य दिवस उत्साहात

**ओझर ।** ओझर शहर माजी सैनिक आणि सिद्धिविनायक फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिद्धिविनायक टाऊनशिप येथे स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.यतीन कदम, प्रमुख पाहुणे म्हणून ओझर नगरपरिषद मुख्याधिकारी किरण देशमुख,सिद्धिविनायक औद्योगिक वसाहतीचे चेअरमन प्रभाकरपंत आढाव आदी उपस्थित होते.

ओझर येथील सिद्धिविनायक टाउनशिप येथे माजी सैनिक डॉ.श्रीराम आढाव,सिद्धिविनायक फाउंडेशनचे अध्यक्ष सचिन आढाव व माजी सैनिकांच्या वतीने स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी भाजप नेते यतीन कदम, ओझर नगर परिषद मुख्याधिकारी किरण देशमुख,सिद्धिविनायक औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष प्रभाकरपंत आढाव,सत्यवान काशिद,माजी सैनिक लटूर सिंह वर्मा, मधुकर पगार, अशोक हैलकर, ऑपरेशन सिंदूर योद्धा हवालदार निलेश सुर्यवंशी होते. ध्वजारोहण मुख्याधिकारी किरण देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी सैनिक श्रीराम आढाव यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले व स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या तसेच आपल्या मनोगतात त्यांनी माजी सैनिकांसाठी सुसज्ज असे उद्यान मंजूर झाल्याबद्दल यतीनभाऊ कदम व मुख्याधिकारी किरण देशमुख यांचे आभार मानले व उद्यानात देश रक्षणासाठी आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या भारतीय सैन्यातील शहिदांच्या स्मरणार्थ भव्य शहिद स्मारक उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सर्व मान्यवर व ऑपरेशन सिंदूर योद्धा हवालदार निलेश सुर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला. कुमार आराध्य कौशिक, कुमार श्रीरंग व कुमारी कनवीका यांचे स्वातंत्र्य दिनानिमित्त छोटेखानी भाषण झाले तसेच कमारी स्वराली, सौ.सुषमा त्रिपाठी व भुपेंद्र शर्मा यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. यावेळी प्रमुख पाहुणे मुख्याधिकारी किरण देशमुख यांनी आपल्या मनोगतात सांगितले की स्वातंत्र्य दिनाच्या या दिवशी सर्व माजी सैनिक येथे येतात आणि राष्ट्रीय उत्सव साजरा करतात त्यांच्या मध्ये राहून आम्हाला हे क्षण अनुभवायला मिळतात हे आमचे भाग्य आहे. शहिद स्मारकाबद्दल नगर परिषदेकडून जी आवश्यक सहकार्य केले जाईल. त्यासाठी मी स्वतः व आपण सर्व माजी सैनिक तसेच यतीनभाऊ कदम सर्वजण प्रयत्न करून हे शहिद स्मारक उभारू या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्व माजी सैनिक डॉ.श्रीराम आढाव व आढाव परिवाराचे त्यांनी अभिनंदन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात यतीनभाऊ कदम यांनी सर्वप्रथम सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या याप्रसंगी ते म्हणाले ओझर शहराच्या कार्यक्षेत्रात एअरफोर्स, आर्मी, नेव्ही व अर्ध सैनिक बल मिळून हजारांहून जास्त माजी सैनिक राहतात ही अभिमानाची गोष्ट



आहे, तसेच शहिद स्मारक पूर्ण करण्यासाठी मी सदैव आपल्या मदतीस आहे येथे सादर केलेल्या विविध कार्यक्रमांचे त्यांनी कौतुक केले, माजी सैनिकांच्या या कार्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या देशाच्या सिमेवर प्राणपणाने लढणा-या सैनिकाचा या राष्ट्रीय कार्यक्रमात गौरव करणे हे आपले कर्तव्य आहे, या वेळी त्यांनी माजी सैनिक डॉ. श्रीराम आढाव व आढाव परिवाराला धन्यवाद दिले. याप्रसंगी माजी सैनिक किशोर कोतकर, रंगराव पाटील, नामदेव अहिरे, शिवदास पाटील, मोतीराम वाघ, संजीव पाटील,बी.एन.तिवारी, दिनेश्वर प्रसाद, बबनराव भरविरकर, किरण जाधव, नितीन माळवे, बी.ओ.गुरव, गणपत धट, दिलीप कुमार नाथ, हरिभाऊ शिंदे, सुरेश चौधरी, अरुण ठुबे, अमितकुमार गौतम, ए.एन.सींग, विजयकुमार ओझा, सुरेश बडगुजर, बी.डी.चौधरी, हरिभाऊ गुंजाळ, विनय पाटे, अशोक पानसरे, सुशीलकुमार चतुर्वेदी, अवधेश त्रिपाठी, अशोक मोरे, संदिप शेटे, मधुकर मोरे, भुपेंद्र कुमार शर्मा, चंद्रिका प्रसाद, संदिप शेटे, पुरूषोत्तम येवले, केशव पवार, तसेच माजी सैनिक परिवारातील सदस्य सौ.शोभा कोतकर, सौ.मंगला पाटील, सौ.आरती चतुर्वेदी , सौ.सुषमा शर्मा, सौ.अनिता वाघ, सौ.नेत्रा गुरव, सौ.छाया गुंजाळ, सौ.सुषमा त्रिपाठी, सौ.मंजुदेवी ओझा, सौ.भारती मोरे, सौ.मुक्ता चौधरी, सौ.मिना पवार, सौ.किरण मिश्रा, सौ.पल्लवी कौशिक , सौ.पुजा गायकवाड, सौ.नेहा सोनवणे, सौ.सिंधुबाई गटकल, सौ.सरला चव्हाण, सौ.कल्याणी मोकळं तसेच रामचंद्र साऊरकर, मगर काका, शांताराम गटकल, तुकाराम गावडे नारायण चव्हाण, ज्ञानेश्वर आढाव, जगन्नाथ शिंदे, सचिन चौधरी, संदिप काकडे, संतोष जाधव, धनसिंग पवार, अण्णा निकम,जयंत गाडेकर, विनोद डोंगरे, विजय परदेशी, युवराज सोनवणे, लक्ष्मण निकम यासह परिसरातील नागरिक व सैनिक परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री.ज्ञानेश्वर भालेराव यांनी केले.लटूर सिंह वर्मा यांनी आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर आढाव, सचिन आढाव, अथर्व आढाव, कृष्णा आढाव, एकनाथ देवकर, साहेबराव वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेत गोपाळकाला, दहीहंडीचे आयोजन



**नाशिक ।** सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त गोपाळकाला व दहीहंडीचे आयोजन करण्यात आले. या निमित्त लहान गोविंदांनी दहीहंडीचा आनंद लुटला. शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र निकम सर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी विद्यार्थी राधाकृष्ण, गोपगोपिकेच्या वेशभूषेत आले होते. त्यामुळे शाळेत अतिशय उत्साहाचे वातावरण होते. श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त श्रीकृष्ण जन्माची गोष्ट छाया जाधव यांनी विद्यार्थ्यांना सांगितली .भावना नागपुरे, क्रांती बोराटे यांनी गवळण सादर करत सोहळ्यात रंग भरला. उत्साहात न्हाऊन निघालेल्या गोपगोपिकांनी "आज गोकुळात रंग खेळतो हरी.... "गोविंदा आला रे आला "या गाण्यांवर ठेका धरला. श्रीकृष्णाची भजने म्हणत दहीहंडी फोडून विद्यार्थ्यांना गोपाळकाल्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षक प्रतिनिधी अशोक शिरूडे, मनीषा जोशी, अश्विनी पगार, किशोरी शुक्ल , प्राजक्ता क्षीरसागर, उषा जोपळे, नीलिमा गायधनी, प्रतिभा बाविस्कर, राहुल चव्हाण, हर्षल कोठावदे, गणेश गांगोडे, निलेश चव्हाण, प्रशांत केंदळे, मनिषा कापसे, , मंगला बनकर, मंजुषा झेंडे, स्वाती जोशी, सुषमा यादव, तेजश्री बुवा, दीपाली पाटील, सारिका सुयवंशी, कविता भामरे, जयश्री भडके आदींसह सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## ➤ महत्त्वाचे

### स्ट्रॉबेरी शाळेच्या विद्यार्थ्यांकडून स्वातंत्र्यदिनी विविधतेतून एकतेचा संदेश

**नाशिक ।** पाथर्डी फाटा येथील कडवेनगर परिसरातील स्ट्रॉबेरी शाळेत स्वातंत्र्यदिना निमित्त



विद्यार्थ्यांनी विविधतेतून एकतेचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी विविध राज्यातील संस्कृतीची ओळख असलेली वेशभूषा परिधान करत भारताच्या अखंडतेचा व एकात्मतेचा संदेश दिला. अंबड पोलिसठाण्याच्या उपनिरीक्षक सविता उंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी स्कूलच्या प्रमुख सायली काळे, अस्मिता काळे, मुख्याध्यापिका संगीता बैरागी आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी भारतीय लष्करातील वेशभूषा परिधान करत भारत मातेचे रक्षण करणारी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व नाटिका सादर केली. स्ट्रॉबेरी स्कूलच्या मेट्रोझोन परिसरातील स्कूलमध्येही स्वातंत्र्यदिना निमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. तसेच चेहर्डी येथील शाखेतही स्वातंत्र्य दिना निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राजीवनगर शाखेतील विद्यार्थिनी स्वातंत्र्य दिना निमित्त रॅली काढली होती. यावेळी मुख्याध्यापिका रंजना खाती, मुख्याध्यापिका प्रियंका क्षीरसागर यांच्यासह शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पिंपळनेर येथे तेली समाजातर्फे प्रा. गवळी यांचा म्हणून सन्मान

**पिंपळनेर ।** येथील तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ नुकताच



संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेशाचे भाजपचे महामंत्री भाऊसाहेब विजय चौधरी हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार मंजुळा गावीत, नंदुरबार जिल्ह्याचे तेली समाजाचे अध्यक्ष संदिप चौधरी हे होते. सर्वप्रथम ज्येष्ठ महिला व नागरीकांचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरीत करण्यात आली.तेली समाज अध्यक्ष पांडुरंग वामन सुर्यवंशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. भाजपाचे महामंत्री विजय चौधरी यांनी आपल्या मनोगतात तेली समाजातील जनतेस एकमेकांना समजून घ्या, संघटनेची पकड मजबूत करण्याचा सल्ला देत मुला मुलींना मोबाईल पासून योग्य ती खबरदारी घेण्याचा सल्ला दिला.आमदार मंजुळा ताई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रा.एल.जे. गवळी हे गेल्या बत्तीस वर्षापासून 'गावरानी मेवा' या समाज प्रबोधन पर कार्यक्रमाचे धुळे, जळगाव, नाशिक नंदुरबार जिल्ह्यातील अनेक गावांत प्रयोग सादर करून आपले स्वतः चे असे स्थान निर्माण केले आहे.यास्तव पिंपळनेर येथील तेली समाजाच्या वतीने प्रा.एल.जे.गवळी यांना 'शिक्षक रत्न' म्हणून सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमास पांडुरंग सुर्यवंशी, सुभाष नेरकर, देविदास नेरकर, भरत बागुल,प्रा. प्रवीण बागुल, देविदास महाले, सुरेश बागुल, प्रा. दिपक नेरकर. यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# स्वामी विवेकानंद विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात



**नाशिक ।** स्वामी विवेकानंद सोसायटी संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयात स्वातंत्र्य दिनाचा उत्सव "हर घर तिरंगा" या उपक्रमाच्या माध्यमातून व १३ ते १४ ऑगस्ट दरम्यान राबवण्यात आला. त्यानिमित्त तिरंगा कॅनव्हास ,प्रश्नमंजुषा स्पर्धा,निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा,अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. परिसरात राष्ट्रभक्ती जागवण्यासाठी तिरंगा प्रभातफेरी ढोल ताशांच्या गजरात काढण्यात आली. प्रभातफेरीत विद्यार्थ्यांनी राष्ट्रपुरुषांची प्रतिमा हातात घेतली.तिरंगा झेंडा उंचावत विद्यार्थ्यांनी "वंदे मातरम्","भारत माता की जय" अशा घोषवाक्यांनी परिसर दुमदुमून टाकला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर झोटिंग यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर आवाजात पसायदान सादर केले. १४ ऑगस्ट रोजी विभाजन विभीषिका स्मृतिदिनाची माहिती क्रीडा शिक्षक अरुण जाधव यांनी विद्यार्थ्यांना दिली. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी प्रमुखपाहुणे शालेय समितीचे अध्यक्ष निरेन सिंदेकर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर विद्यालयाच्या गीतमंचाने राष्ट्रगीत व ध्वजगीत सुमधुर स्वरात सादर केले. प्रतिज्ञा व भारताचे संविधान सादर केले. विद्यालयाचे शिक्षक सचिन चांगटे यांनी व्यसनमुक्तीची शपथ सर्व उपस्थित विद्यार्थी व शिक्षकवृंद यांना दिली. शालेय विद्यार्थ्यांनी सुमधुर संगीतावर कवायत सादर केली. विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण स्वरात देशभक्तीपर समूहगीत गायन करून देशप्रेम जागवले. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपुरुषांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या .स्वातंत्र्यदिनानिमित्त घेतलेल्या देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना व मार्गदर्शक वर्गशिक्षक योगेश देवरे, मनीषा पवार,मीनल लोखंडे, प्रभाकर साबळे, छाया पावडे यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी अश्वदीप चौधरी, राधिका पासवाण, रिया बेलोकर, नईम शेख यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

प्रसंगी व्यासपीठावर स्वामी विवेकानंद सोसायटीच्या उपाध्यक्ष प्रेरणा कुलकर्णी, विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर झोटिंग, पर्यवेक्षिका शुभदा टकले, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा चैताली परदेशी, सहसचिव बाळकृष्ण अहिरे व बहुसंख्येने पालक व विद्यार्थी ,शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारीवृंद आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक अरुण जाधव व विद्यार्थिनी शर्वरी अहिरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शर्मिला बागले,दीपा काला,संगीता पिंगळे,नीता पाटील, कलाशिक्षक पुंडलिक बागुल, संतोष उदार,ललित शार्दुल व सांस्कृतिक मंडळांने परिश्रम घेतले.

# न्यू इंग्लिश स्कूल आडगाव येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**नाशिक ।** रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल आडगाव येथे भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

ध्वजारोहण प्रसिद्ध उद्योजक विलास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. हर तिरंगा उपक्रमा अंतर्गत तंबाखू मुक्त शपथ, ज्येष्ठ नागरिक सुरक्षा शपथ घेण्यात आली. इयत्ता 8 वी व 9 वी च्या स्काऊट गाईड पथक संचालनातून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. कवायत संचलन घेण्यात आले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. तसेच पेव्हर ब्लॉक कामासाठी मदत करणारे थोर देणगीदारांचा सत्कार घेण्यात आला. या प्रसंगी शालेय विविध समितीचे सदस्य, माजी विद्यार्थी, पालक व पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक राजू साठे यांनी उपस्थितींना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे पर्यवेक्षक संदीप शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष फुलमाळी, वैशाली दिघे यांनी केले तर जगदीश पाटील यांनी उपस्थितीतांचे आभार मानले.

### नासिक लायन्स क्लबतर्फे ५०० नारळाचे झाडांची लागवड



**नासिक लायन्स ग्रुप सुप्रीमच्या वतीने मोहिमेवाडी त्र्यंबक रोड येथे ५०० नारळाच्या झाडांची स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून लागवड करण्यात आली. यावेळी लायन मेंबर हिरामण सोनवणे, दिलीप सिंग पाटील, निर्मळ, सेक्रेटरी के. पी. धात्रक, राजेंद्र पगार, भामरे, क्लबचे अध्यक्ष एन. एस. पाटील, संस्थापक अध्यक्ष जी.पी. जाधव व खजिनदार राजेंद्र खैरनार उपस्थित होते.**

# बेशुद्धतेच्या अंध:कारातून उज्ज्वलतेकडे ॲक्युट निक्रोटाईझिंग एनकेफॅलोपॅथीवर मात



**नाशिक ।** कुमारी केडिया वय वर्ष 20, वैद्यकीय शाखेची विद्यार्थिनी, अशोका मेडिकल हॉस्पिटल मध्ये बेशुद्धपणा, ताप, डोकेदुखीसाठी तसेच फिट येत असल्याकारणाने डॉ. सुशील अंतुर्लीकर यांच्या देखरेखी खाली आयसीयू मध्ये ॲडमिट झाली. त्यानंतर तिच्या महत्त्वाच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या व तिला ॲक्युट निक्रोटाईझिंग एनकेफॅलोपॅथी ह्या आजाराचे निदान झाले. तिला गरज असलेले व इमर्जन्सी सर्व औषधोपचार चालू करण्यात आले.

हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर देखील तिला मधून मधून फिट येतच होत्या. तिचा बेशुद्धपणा हा वाढतच जात होता. त्याकरिता फिट बंद होण्याचे औषध गरजेनुसार वाढवण्यात आले. तसेच तिला श्वास घेण्यासाठी घशामध्ये श्वासनलिका टाकण्यात आली व व्हेंटिलेटरवर घेण्यात आले. साधारण सात ते आठ दिवसानंतर तिचे फिट येणे बंद झाले. तिने डोळे उघडणे व काही हालचाली चालू केल्या. तसेच काही प्रमाणात साध्या सूचनांचे पालन देखील करू लागली. तिची प्रकृती स्थिर झाल्यानंतर तिला तिच्या मूळ गावी अमरावतीला पाठवण्यात आले. डॉ. अंतुर्लीकर फिजिशियन, डॉ. विशाल सावळे मेंदू रोग तज्ञ, सर्व इंटेनसिव्हिस्ट, आयसीयु टीम व अशोका मेडिकल हॉस्पिटलच्या सर्व टीमने पेशंटच्या रिकव्हरीसाठी पुरेपूर प्रयत्न केला व त्याकरिता संपूर्ण केडिया परिवाराने डॉ. अंतुर्लीकर व अशोका मेडिकवर हॉस्पिटलच्या पूर्ण टीमला धन्यवाद दिले.

# छगन भुजबळांच्या हस्ते राष्ट्रवादी भवन येथे ध्वजारोहण

**नाशिक ।** देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्याला देशात शेवटच्या घटकाला जेव्हा स्वातंत्र्याची फळे मिळतील तेव्हाच सुराज्य निर्माण होईल असे महात्मा गांधी यांनी सांगितले होते. आजही अनेक वंचित घटक समाजात आहे. या वंचित घटकांना जोपर्यंत पूर्णपणे स्वातंत्र्याची फळे मिळत नाही. तोपर्यंत आपल्याला सर्वांना काम करावे लागणार आहे. वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे, असे प्रतिपादन पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केले.

देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने भुजबळ यांच्या हस्ते राष्ट्रवादी भवन, मुंबई नाका येथे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भुजबळ ते बोलत होते.



यावेळी भुजबळ पुढे म्हणाले की, देश आज मोठ्या प्रमाणात प्रगती करत आहे. मात्र या स्वातंत्र्याची फळ काही लोकांपर्यंत पोहचत आहे. हे स्वातंत्र्य तळागाळातील वंचित घटकापर्यंत हे स्वातंत्र्य पोहचले पाहिजे. त्यासाठी आपल्या सर्वांना काम करायचे आहे. ज्यावेळी खऱ्या अर्थाने शेवटच्या माणसाला स्वातंत्र्याची फळे मिळतील. तेव्हाच महात्मा गांधी यांना अभिप्रेत सुराज्य निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वांनी पक्षाची ध्येय, धोरणे समाजातील तळागाळापर्यंत पोचवावी. समाजातील जे घटक आजही वंचित आहे. त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी काम करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार, जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, माजी आमदार जयवंत जाधव, प्रदेश पदाधिकारी नानासाहेब महाले, महिला शहराध्यक्षा योगिता आहेर, महिला जिल्हाध्यक्षा प्रेरणा बलकवडे, प्रदेश पदाधिकारी निवृत्ती अरिंगळे, गौरव गोवर्धणे, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे यांच्यासह ,सचिन जाधव, संजय खैरनार, मुख्तार शेख, धनंजय निकाळे, समाधान जेजूरकर, भारत जाधव, निर्मला सावंत, चिन्मय गाढे,नितीन चंद्रमोरे, अमोल नाईक, प्रमोद सोनवणे, मनीष रावळ, संतोष शेळके, देविदास हेकरे, संकेत निमसे, बाळासाहेब गिते, मनोहर कोरडे, मकरंद सोमवंशी, शंकर मोकळ, गणेश पवार, प्रशांत खरात, रमेश जाधव, सागर लामखेडे, नाना साबळे, सलीम पठाण, नियामत शेख, विक्रम कोठूले, दत्ताकाका पाटील, जय कोतवाल, योगेश दिवे, राधाकृष्ण नाईकवाडे, रवींद्र जाधव, दादासाहेब कापडनीस, नाना पवार, प्रकाश थामेत, सुलेमान सय्यद, सचिन वाघ, हेमंत कांबळे, ज्ञानेश्वर महाजन, विजय पंडित,विनोद डोके, पोपटराव जेजूरकर, सुनिल अहिरे, विजय तुपलोंढे, अरविंद सोनवणे, राजेश भोसले,उदय सराफ, दिलीप दोंदे, मोतीराम पिंगळे, ईश्वर अहिरे, बाळू गांगुर्डे, सुरेखा निमसे, रितेश केदारे, प्रशांत गांगुर्डे, विकास सोनवणे, कैलास बनकर, आदेश जावळे, सतिश वाघ, सुनिल गुंजाळ, विलास डोंबाडे, दीपक गांगुर्डे, मच्छिंद्र माळी, गणेश काटकर, राजेंद्र नगरकर, अशोक डबल, देविदास बिडवे, जीभाऊ अहिरे, रंजना गांगुर्डे, किशोरी खैरनार, संजीवनी जाधव, जयश्री जाधव, रूपाली पठारे, अपर्णा खोत, किरण जगझाप, रेहान शेख, डॉ.संदिप चव्हाण, कुलदीप जेजूरकर, अक्षय परदेशी, व्यंकटेश जाधव, शुभम पगारे, राकेश कांबळे, अवधूत पगारे, किशोर गरड, कुणाल बागडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जि.प.तील पदोन्नती प्रक्रियेला भ्रष्टाचाराचे गालबोट? समुपदेशनाकडे सर्वांचे लक्ष

सुधीर उमराळकर

**नाशिक ।** जिल्हा परिषद आणि वाद हे कायमचे समीकरण झाले आहे. लैंगिक शोषण प्रकरणानंतर अजूनही सावरत असलेल्या नाशिक जिल्हा परिषदेत पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली आहे. वरिष्ठ सहाय्यक लिपिक पदावरून कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदासाठी होत असलेली पदोन्नती प्रक्रिया संशयास्पद घडामोडींमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.




पदोन्नतीसाठी जिल्हा परिषदेत सौदेबाजी झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. एका महिला कर्मचाऱ्याने वादग्रस्त कक्ष अधिकाऱ्यांकडे “अर्थपूर्ण” फिल्डिंग लावल्याची चर्चा परिषदेत रंगली आहे. मुख्यालयातच नेमणूक मिळण्यासाठी ‘लाख मोलाची’ बोली लावण्यात आल्याचे सांगण्यात येत, यापैकी अर्धे काम झाले असून, उर्वरित काम पूर्ण झाल्यानंतर देण्याचे ठरल्याचे समजते.

गेल्या वर्षी अनुकंपा भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर आरोप झाले होते. अगदी सुट्टीच्या दिवशीही तत्कालीन उपमुख्य अधिकाऱ्यांना भरती यादीत फेरबदल करावा लागला होता. त्यानंतर उमेदवारांकडून आर्थिक तडजोडी झाल्याचे आरोप झाले होते. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे स्वतः मुख्य अधिकाऱ्यांनी भरतीची सूत्रे हाती घेतली होती. त्यानंतर अलीकडच्या काळात महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषणाच्या मुद्द्याने राज्यभर खळबळ उडवली होती. या प्रकरणात तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे निलंबन झाले. आरोग्य अधिकाऱ्यासह एका कक्ष अधिकाऱ्यांवरही गंभीर आरोप झाले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी

> **पदोन्नतीची फाईल सध्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणाची माहिती पुरवणाऱ्या वादग्रस्त अधिकाऱ्यांकडे असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे.**

अशीमा मित्तल यांची बदली होऊन ओंकार पवार यांनी पदभार स्वीकारला.

जिल्हा परिषदेत १२ ऑगस्टला वरिष्ठ सहाय्यक लिपिक पदावरून कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेअंतर्गत एकूण आठ वरिष्ठ सहाय्यकांचा समावेश असून, त्यापैकी सहा जणांना पदोन्नती तर दोन कर्मचाऱ्यांना प्रतीक्षा यादीत ठेवण्यात आले आहे. त्यासाठी १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता कर्मवीर कै. रावसाहेब थोरात सभागृहात समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेत भरती, पदोन्नती आणि बदल्या म्हटल्या की आर्थिक उलाढाल होत असल्याचे अनुभवाने सिद्ध झाले आहे. त्यामुळे या पदोन्नती प्रक्रियेतही संशयास्पद उलाढाल झाल्याची चर्चा असून,त्यामुळे सेवाजेष्ठता यादीत फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सेवाजेष्ठता डावलून पदोन्नती झाल्यास अन्याया विरुद्ध थेट न्यायालयीन लढाईची तयारी काही कर्मचाऱ्यांनी दर्शवली आहे. त्यामुळे पदोन्नती प्रक्रियेकडे संपूर्ण जिल्हा परिषदेचे लक्ष लागून आहे, अशा परिस्थितीत, नव्या मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांच्या समोर पारदर्शक पदोन्नती प्रक्रिया पार पाडण्याचे मोठे आव्हान आहे.या प्रक्रियेत ते काय भूमिका घेतात याकडे जिल्हा परिषद तसेच संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

## महत्त्वाचे

### राष्ट्रीय महामार्गावर जलवाहिनी टाकण्यास अखेर परवानगी

**इंदिरानगर ।** लेखानगर येथील वाळूच्या ठिय्याजवळील राष्ट्रीय महामार्गावर जलवाहिनी टाकण्यासाठी अखेर परवानगी मिळाली आहे. ती कलानगर जलकुंभाशी जोडणी करता येणार



असून, इंदिरानगर, कलानगर, श्री जयनगर, कमोदनगर आणि आजू बाजूच्या परिसरातील सुमारे ३० हजार नागरिकांचा पाणीपुरवठा सुरळीत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या कामासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण परवानगी देत नव्हते.त्यामुळे आमदार देवयानी फरांदे, प्रभाग क्रमांक ३० चे माजी नगरसेवक सतीश सोनवणे, डॉ. दीपाली कुलकर्णी, ॲड. श्याम बडोदे, सुप्रिया खोडे यांनी महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांची भेट घेऊन आवश्यक त्या परवानग्या मिळवण्याची मागणी केली होती. आयुक्त खत्री यांनी याची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाशी थेट संवाद साधून परवानगी मिळवून दिली. गुरुवार दि. १४ ऑगस्ट सकाळी १२:३० वाजता अधीक्षक अभियंता रवींद्र धारणकर आणि कार्यकारी अभियंता प्रकाश निकम यांच्या मार्गदर्शनाखाली, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी ज्ञानेश्वर जगताप, साईश गवळी, दीपक निकम यांनी उड्डाणपुलाखाली जलवाहिनी शोधण्याचे काम हाती घेतले आहे. येत्या ऑक्टोबर महिन्यात खोदकाम पूर्ण करून जलवाहिनी टाकली जाईल आणि कलानगर जलकुंभाला जोडणी करण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### मनसे सहकार सेनेची बैठक संपन्न; अध्यक्ष धोत्रे यांचे मार्गदर्शन

**नाशिक ।** राजगड मध्यवर्ती कार्यालय येथे काल (दि.१७) महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेनेचे अध्यक्ष दिलीप बापू धोत्रे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश सरचिटणीस दिनकर अण्णा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार व संघटन याकरिता बैठक झाली. हाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष सुदाम कोंबडे यांनी प्रस्तावनेत सहकार सेनेच्या बांधणी संदर्भात मार्गदर्शन केले . या बैठकीदरम्यान संघटनेचा विस्तार व प्रसार या संदर्भात मनसे पदाधिकारी यांना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस दिनकर अण्णा पाटील यांनी मार्गदर्शन करताना राजकारणातील सहकार क्षेत्राचे महत्व व या माध्यमातून गोरगरीब सामान्य जनतेचे प्रश्न



कशा पद्धतीने सोडवले जातात तसेच सहकार क्षेत्र हे दैनंदिन आयुष्यात किती महत्त्वाचे आहे याचे मार्गदर्शन केले. या बैठकीस उपस्थित असलेले सहकार सेनेचे अध्यक्ष व मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेनेचे काम करण्याची पद्धत, संघटनात्मक रचना, सहकार व उद्योग क्षेत्रात कशा पद्धतीने काम केले जाते. सहकार सेनेमार्फत पक्षाचा कार्यकर्ता कसा उभा राहील याची माहिती व येणाऱ्या काळात महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेना या नाशिक जिल्ह्यात व शहरात कशा पद्धतीने काम उभारेल याची माहिती दिली व मार्गदर्शन केले. आभार महिला उपाध्यक्षा सुजाता डेरे यांनी मानले व सहकार सेनेच्या मार्फत महिला सक्षमीकरण या वर आपले विचार मांडले.या बैठकीस सहकार सेने सरचिटणीस विजय जाधव, अनिशा माजगावकर, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला सेना प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे, जिल्हा उपाध्यक्ष नामदेव पाटील, शहर समन्वयक भाऊसाहेब निमसे, सहकार सेना पदाधिकारी राकेश परदेशी, विभाग अध्यक्ष योगेश दाभाडे, जनहित विधी विभाग जिल्हाध्यक्ष प्रफुल बनबेरू, महिला सेना शहराध्यक्ष अक्षरा घोडके, स्वागता उपासनी, सुयश मंत्री, हितेश गुरव, पराग भुसारी, दिनेश विश्वकर्मा, रागिनी कोदे, प्रीती अवार्ड, चेतन वावरे, राहुल रोटे, वैभव रौंदळ, अमोल वागचौरे, सागर सिन्नरकर, विशाल पवार, प्रदीप सोनवणे, विनायक काटे, रोहित गायकवाड, निखिल शिंपी, संदीप शिंदे यांचा सहकार सेनेचे सर्व पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक मोठे संख्येने उपस्थित होते.

### गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

**नाशिक ।** आपला व आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्यासाठी प्रत्येकाला व्यवसाय, नोकरी करावी लागते. मात्र ते करताना एखादी कला, छंद यांची जोपासना केली तर आयुष्य



आनंदमय, समृद्ध होते. कलानिर्मितीचा आनंद स्वतः घेऊन इतरांना देता येतो. म्हणून सर्वांनी बालवयात आवडणारी कला आत्मसात करावी असे प्रतिपादन वरिष्ठ पत्रकार व कलासमिक्षक संजय देवधर यांनी केले. गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. ब्राह्मण महासंघ सातपूर विभागातर्फे शाडू मातीची गणेशमूर्ती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ पत्रकार, कलासमीक्षक संजय देवधर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सर्व सहभागींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिपिका पंचभाई व अच्युत कुलकर्णी यांनी दिले. सहभागी बालगोपाल व मोठ्यांनी २ तासात सुंदर, सुबक गणपती बाप्पा तयार केले. प्रत्येकाचा आकार निराळा, रूप वेगळे मात्र कलेवर आणि बाप्पावर श्रद्धा असल्याने सर्वांना समाधान मिळाले. सर्वोत्कृष्ट गणेश मूर्ती बनवणाऱ्या आर्य आनंद अवस्थी आणि मायरा राजेंद्र पाटील यांना संजय देवधर यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. ब्राह्मण महासंघ शहराध्यक्ष भगवंत (बाळासाहेब) पाठक, महिला कार्याध्यक्षा सोनाली(ताई) कुलकर्णी, प्रदेशाध्यक्ष भूषण जुन्नरे, शहर उपाध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी, युवा शहराध्यक्ष संदेश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वी झाली. सांस्कृतिक समिती प्रमुख श्रीकांत देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

## डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा



**नाशिक ।** भारत हा विविध भाषा आणि संस्कृती जपणारा देश असून, विविध जाती-धर्मांचे लोक या ठिकाणी गुण्यागोविंदाने नांदतात. यामध्ये समानतेचा धागा आहे. भारत हा जगात बलाढ्य देश असून, सार्वभौमत्व जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.

मविप्र समाज संस्थेच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, फिजिओथेरेपी महाविद्यालय, परिचर्या शिक्षण संस्था आणि फार्मसी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित स्वातंत्र्य दिन कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी अधिष्ठाता डॉ. कैलास मोगल, वैद्यकीय अधीक्षक डॉ.वसंतराव कवडे, प्राचार्या डॉ. अमरित कौर, प्राचार्या डॉ.पौर्णिमा नाईक, प्राचार्य डॉ.नितीन हिरे, सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद देशपांडे, क्रीडा संचालक प्रा. दिलीप गायकवाड, सर्व विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, परिचारिका, पदवी आणि पदव्युत्तर विद्याशाखांचे विद्यार्थी उपस्थित होते.

## नाशिककरांचा भटक्या श्वानांसाठी मूकमोर्चा



**नाशिक ।** येथील प्राणीप्रेमी नागरिकांनी भटक्या श्वानांसाठी शनिवारी (दि.१६) संध्याकाळी मूकमोर्चा काढला. हातात फलक घेऊन सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या रस्त्यावरील कुत्र्यांना स्थलांतर करण्याच्या आदेशाचा विरोधात हा मोर्चा काढण्यात आला होता.

मोर्चाला अशोक स्तंभ येथील प्राणी दवाखाना येथून प्रारंभ झाला. अशोक स्तंभ ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी कुत्र्यांचे स्थलांतर हा उपाय नाही. योग्य मार्ग म्हणजे नसबंदी, लसीकरण होय. आहे त्या परिसरातच कुत्र्यांची काळजी घेणे या उद्देशाने मोर्चा काढण्यात आला. या वेळी नागरिकांकडून किमान ५,००० स्वाक्षऱ्या गोळा करून त्या सर्वोच्च न्यायालय, दिल्ली सरकार आणि जिल्हाधिकारी नाशिक यांना पाठवण्यात येणार आहे. या मोर्चाचे आयोज आयोजन प्राणीमित्र भारती जाधव, विक्रांत देशमुख, पुरुषोत्तम आव्हाड, शरण्या शेटटी आदींनी केले होते. या मोर्चात नाशिक शहरातील प्राणी मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## म्हसरूळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे पथकाची उल्लेखनीय कामगिरी

**नाशिक ।** पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ मोनिका राऊत आणि सहा. पोलीस आयुक्त पंचवटी विभाग संगिता निकम यांच्या आदेशानुसार चोरी व घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी म्हसरूळ पोलीस ठाणे कडील गुन्हे शोध पथकाने धडाकेबाज कामगिरी करत घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावला.




गुन्हे पथक पेट्रोलिंग करीत असताना पो.अं. नितीन पारधे व पो.अं. पंकज चव्हाण यांना गुप्त माहिती मिळाली की, फुलेनगर पाटाजवळ १४ वर्षीय विधी संघर्षित बालक आपल्या साथीदारांसह गुन्ह्यात सहभागी आहे. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने आणखी दोन साथीदारांसह चोरी व घरफोडी केल्याची कबुली दिली.

तपासादरम्यान त्यांनी चोरलेल्या मालाची विक्री सोनार व भंगार विक्रेत्यांकडे केल्याचे उघड झाले. पोलिसांनी तपास करून एकूण ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. त्यामध्ये २,३०,००० किमतीचे २ तोळे ३ ग्रॅम सोन्याचे दागिने,३०,००० किमतीची २०५ ग्रॅम चांदीची लगड,७,००० किमतीचा ६७ ग्रॅम चांदीचा कमरपट्टा,३,००० किमतीचा २८ ग्रॅम चांदीचा छल्ला,६०,००० किमतीचे १२ नग ब्राँझ व पितळ धातूचे डायव्हर्टर कामगिरीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंकुश चिंतामण, सपोनि उमेश बोरसे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उप निरीक्षक, दिपक पटारे,पो. हवा देवराम चव्हाण, पो. हवा राकेश शिंदे, पो. हवा वालझाडे, पो.अं. नितीन पारधे, पो. अं. पंकज चव्हाण, पो.अं. ज्ञानेश्वर कातकाडे, पो.अं.पंकज महाले, पो. अं. भाउराव गवळी, पो.अं. गुणवंत गायकवाड, पो.अं. स्वप्निल गांगुर्डे, पो.अं. योगेश सस्कर यांनी केलेली आहे. म्हसरूळ पोलीस ठाण्याच्या या कार्यवाहीमुळे घरफोडी आणि चोरीच्या गुन्ह्यांवर मोठा आळा बसला असून नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.

## बनावट देशी दारू निर्मिती कारखान्यावर राज्य उत्पादन शुल्क भरारी विभागाची धडक कारवाई

**नाशिक ।** राज्य उत्पादन शुल्क नाशिकच्या भरारी पथकाने धुळे जिल्ह्यातील राणी तालुका शिंदखेडा आणि रॉयल हॉटेल शेजारी दोंडाईचा नंदुरबार रोडवर दोंडाईचा शिवारात छापा टाकून बनावट देशी दारू निर्मितीचा मोठा कारखाना उद्ध्वस्त केला. या कारवाईत लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई आयुक्त राजेश देशमुख, सह आयुक्त प्रसाद सुर्वे,उपायुक्त उषा वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली.राज्य उत्पादन शुल्क,निरीक्षक गौडा, धिंदळे,मंडलिक,गांगुर्डे,रायतेकर यांच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून तपासणी केली असता देशी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे विविध साहित्य व उपकरणे आढळून आली. त्यात ४३० लिटर स्पिरीट, ७५० लिटर नायरा, ५३० लिटर बनावट देशी दारू (५० बॉक्स), मोजमापासाठीचे उपकरणे,



प्लॅस्टिक कॅन, रिकाम्या बाटल्या, झाकण्या, पॅकिंग मटेरियल तसेच रसायने व इतर साहित्य यांचा समावेश आहे.

जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे ७,३५,७१२ रुपये एवढी आहे. या प्रकरणी दीपजीत प्रकाश जगताप (रा. गबाजी नगर दोंडाईचा ), राकेश राजपूत धुळे (शिरपूर जिल्हा सावळदे) संशयित फरार या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. राज्य उत्पादन शुल्क विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या बेकायदेशीर दारू निर्मिती, विक्री व साठवणुकीबाबत कोणतीही माहिती असल्यास विभागाच्या टोल-फ्री क्रमांक १८००२३३३३३३ किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ९८२३०२३१४७ वर कळवावी.


## गणेशोत्सवाला यंदा आगामी निवडणुकीची किनार...

### धार्मिक महामहोत्सवातून राजकीय मंडळींची मतं बांधणी




नाशिक सार्वजनिक गणेशोत्सव अगदी समीप आला आहे. गणरायाच्या आगमनाची सर्वत्र लगबग सुरू असून, सारे राजकीय पक्ष प्रचंड लोकाश्रय लाभलेला हा सार्वजनिक सांस्कृतिक उत्सव आगामी येऊ घातलेल्या निवडणुकीच्या दृष्टीने कॅश करण्यासाठी सरसावले आहेत.

दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणुकोत्सव रंगणार असल्याने राजकीय मंडळींनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यासाठी या मंडळींना गणेशोत्सवासारखे चांगले व्यासपीठ लागणार आहे. त्याचा मतांसाठी चपखलपणे फायदा कसा करून घेता येईल, यासाठी ही मंडळी सक्रिय न झाली तर नवलच! गणेशोत्सवाला यंदा निवडणुकीची किनार लाभल्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना राजकीय मंडळी तथा इच्छुकांकडून



भरघोस निधी, देणग्या आणि हवे ते सहकार्य मिळत असल्याचे चित्र आहे. सारेच राजकीय पक्ष हा प्रचंड लोकाश्रय लाभणारा सांस्कृतिक महाउत्सव कसा कॅश करता येईल यासाठी नाना क्लुप्त्या लढवीत आहेत.

अनेक राजकीय नेते, पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि प्रमुख कार्यकर्ते मंडळी कोणत्या ना कोणत्या गणेश मंडळांशी संलग्न आहेत. त्यामुळे त्यांनी यंदा आर्थिक हात चांगलाच सैल सोडल्याचे निदर्शनास येत आहे. आपापल्या प्रभाग, परिसरातील लहान-मोठ्या गणेश मंडळांना भरघोस देणग्या मिळत असून, दहा दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा बार उडणार आहे. यानिमित्ताने कार्यकर्त्यांनाही सुगीचे दिवस आले आहेत. प्रमुख राजकीय पक्ष भाजप, दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, काँग्रेस, मनसे यांच्यासह सर्वच छोटे-मोठे राजकीय पक्ष-संघटनांनी हा उत्सव कॅश करीत मतांचे दान पदरात पाडून घेण्यासाठी मोर्चेबांधणी केल्याची चर्चा आहे.

गणेश स्थापनेपासून तर गणेश विसर्जनापर्यंतच्या प्रत्येक उपक्रम, कार्यक्रमातून लोकांसमोर जाण्याची एकही संधी ही मंडळी गमावणार नाही. त्यातूनच मतबांधणी करताना, आपल्या पक्षाची शेखी मिरवताना, विरोधकांवर सडकून टीका करण्याची संधी साधत निवडणुकीचा मार्ग सुकर करण्याचे साऱ्यांचे मनसुबे निदर्शनास येत आहेत. गणेशोत्सवाला यंदा निवडणुकीची किनार लाभल्याने यंदा खूपच मोठी आर्थिक उलाढाल होईल यात शंका नाही. सर्वच राजकीय पक्ष-संघटनांनी गणेशोत्सवातून कार्यकर्त्यांची मोट बांधण्याबरोबरच तळागाळापर्यंत पोहोचण्याचा वज्रनिर्धार केल्याची म्हणूनच खमंग चर्चा आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून बाप्पांबद्दल अतिप्रेम उफाळून आलेल्या यातील कोणत्या मंडळींना बाप्पा पावणार आणि कोणाला सत्तेचे पायसदान मिळणार याकडे भाबड्या गणेश भक्तांचे लक्ष न लागले तर नवलच!

# भक्ती, परंपरा आणि निसर्गरक्षणाचा खरा संगम

गणपती बाप्पा म्हंटलं की आपल्या डोळ्यासमोर उभा राहते ती हातात लाडू आणि पोट मोठं असलेली प्रतिमा. बाप्पा अवघ्या काही दिवसांतच आपल्या सर्वांच्या भेटीला येणार आहे. त्याच्या आगमनाची आस संपूर्ण पंचक्रोशीत लागली. बाप्पा घरी आला की वातावरण कसं अगदी प्रसन्न होऊन जातं. घरात असले नसलेले क्लेश दूर होतात आणि सर्वजण एकत्र येऊन बाप्पाला पूजतात. त्याची आराधना करतात. बाप्पा प्रत्येकाच्या आयुष्यात असलेलं विघ्न दूर करून आनंदी वातावरण निर्माण करतो. पण त्याच आनंदी वातावरणाला दूषित करण्याचं काम आपण करतो. अर्थ हाच की, गणपती बाप्पाला आपण आणतो तेव्हा आपण काय पाहतो? त्याचा रंग, रूप आणि त्याची रचना पाहतो. पण आपण एक गोष्ट विसरतो... ती म्हणजे मूर्ती शाडूच्या मातीची आहे की, पीओपीची (प्लास्टर ऑफ पॅरिस)... आता तुम्ही म्हणाल की, मूर्ती कशाची का बनलेली असेना बाप्पा बाप्पा असतो. पण असं योग्य आहे का?

--------------

ज्या सृष्टीची निर्मिती ज्याने केली आहे, तोच पर्यावरणाला हानिकारक होतोय असं म्हंटल तर... किती भयानक वाटत न ऐकायला. अहो मग आपण तेच तर करत आहोत ना... देवाने एवढ्या सुंदर निसगार्ची निर्मिती केली आहे. इथले जीव, जंतू या पृथ्वीची सुंदरता वाढवतात आणि आपण सणांच्या नावाखाली, सुंदर रूपाच्या आणि उंचीच्या नावाखाली गणपतीची मोठी मूर्ती बनवून गाजावाजा करतो मात्र हा विचार करत नाही की, ते पर्यावरणाला किती हानिकारक आहे.

पीओपी ही एक कृत्रिम रसायनमिश्रित पांढरी धूळ असून तिचा वापर मूर्ती बनवण्यासाठी केला जातो. ही धूळ पाण्यात मिसळल्यावर घट्ट होते आणि त्यावर हवे तसे आकार व रंग देता येतात. हेच गुण पाहता अनेक मूर्तिकार पीओपी वापरतात कारण ती स्वस्त असते, हलकी असते आणि लगेच तयार करता येते.

पण नेमकी हीच सोय प्रकृतीच्या अस्वस्थतेला कारणीभूत ठरते. पीओपी हा पदार्थ निसर्गात सहजपणे विघटित होत नाही. एकदा पीओपी पाण्यात मिसळून वाळवला की, तो फारच कठीण होतो आणि सहज विघटन होत नाही. जेव्हा पीओपी मूर्ती विसर्जनासाठी तलावात किंवा नदीत टाकली जाते, तेव्हा ती वर्षानुवर्षे तशीच राहते, विघटित होत नाही. यामुळे पाणथळ जागेचं नैसर्गिक संतुलन बिघडतं.

जेव्हा या मूर्तींचं विसर्जन तलावात, नद्या, समुद्र यामध्ये केलं जातं, तेव्हा त्या मूर्ती पाण्यात सहज विरघळत नाहीत. उलट त्या पाण्यात अडकून राहतात, तळाशी बसतात आणि तलावाचं स्वच्छ, नैसर्गिक रूप हळूहळू गमावतं. अशा मूर्तींवर वापरले जाणारे रंग आणि सजावटीसाठी वापरण्यात येणारे झिलमिल पदार्थ अनेक वेळा रासायनिक आणि विषारी असतात. यातून पाण्यात ꣾ (सीसा), ꣾ१४१८ (पारा), ꣾ आणि इतर धोकादायक धातू मिसळतात. यामुळे मासे, कासव, बेडूक यांचं अस्तित्व धोक्यात येतं. इतकंच नाही, तर या प्रदूषित पाण्याचा वापर जर शेतीसाठी किंवा प्यायच्या पाण्यासाठी झाला, तर माणसांच्या आरोग्यावरही याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे मोठा गणपती जरी आकर्षक वाटत असला तरी निसगार्साठी तो हानिकारक आहे. म्हणजेच काय तर एकीकडे आपण गणपती बाप्पाला "मंगलमूर्ती मोरया" म्हणत मोठ्या श्रद्धेने पूजतो, तर दुसरीकडे त्याची मूर्ती विसर्जित करताना आपणच निसर्गाचा अपमान करत असतो. बाप्पाचा उत्सव जितक्या भक्तीने साजरा होतो, तितक्याच निसर्गप्रेमाने तो पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हायला हवा.

शाडू माती ही एक नैसर्गिक आणि जैवविघटनशील माती असते. ती सहसा नदीकिनाऱ्यांवर किंवा तलावाजवळ सापडते आणि अतिशय मृदू, चिकटसर आणि सुलभपणे आकार घेणारी असते. त्यामुळे तिचा वापर मूर्ती बनवण्यासाठी अगदी योग्य मानला जातो. आज ज्या वेगाने ढडढ मूर्तींमुळे जलप्रदूषण होत आहे, त्याच्या तुलनेत शाडू माती ही पर्यावरणाशी एकरूप होणारी शांत, संयमित आणि संतुलित निवड आहे.

पीओपी मूर्तीच एकप्रकारे बाजारीकरणच झालं आहे. मोठमोठे मंडळं, स्पर्धा, लाइट्स, सजावट, सोशल मीडियावर व्हायरल होणारी आरास. यात मूर्ती एक उत्पादन बनते, उपास्य रूप राहात नाही. त्या स्पर्धेमध्ये कोणती मूर्ती मोठी, सुंदर, आकर्षक आहे याला जास्त महत्त्व दिलं जातं. मूर्ती कोणत्या भावनेतून बनवली गेली, तिच्या मागचं पर्यावरणीय दृष्टिकोन काय आहे, हे विचारलंही जात नाही आणि नाही त्याचा विचार केला जातो.

या सर्व गोष्टी लक्षात घेता शासनानेही काही ठिकाणी पीओपी मूर्तींवर बंदी आणलेली आहे, परंतु ती संपूर्णतः यशस्वी होण्यासाठी सामान्य लोकांना पुढाकार घ्यावा लागेल. सजावट, स्पर्धा, आकर्षण या सगळ्या गोष्टींमधून पर्यावरणाचं भान सुटू नये, याची काळजी घेणं हीच खरी निसर्गपूजा ठरेल. हे केवळ तलाव आणि नद्या प्रदूषित करणं नाहीये, तर आपल्या आध्यात्मिकतेचं आणि परंपरेचंही प्रदूषण आहे.

निसर्ग म्हणजेच बाप्पाचं मूळ रूप आहे. तो चराचरात वसलेला आहे. निसर्गात, जंगलात, पाण्यात, पक्षात मग आपणच त्याला झिरो ऑक्सिजन असलेल्या तलावात विसर्जित करून त्याचं अस्तित्व गुदमरत का टाकतो?

यावर मूर्तिकार 'मंगेश छत्रे' असं म्हणतात की, पीओपीच्या मूर्तींवर अनेक जणांचे पोट आधारलेलं आहे. अनेकांचा त्यामुळे उदरनिर्वाह होतो. तसेच पीओपीच्या मूर्ती बनवणं खूप सोपं असतं. त्याला मेहनत कमी लागते आणि वेळेचीही बचत होते.



तसेच साच्यात टाकल्या टाकल्या त्याला आपल्याला हवा तसा आकार दिला जातो. त्यामुळे पीओपीच्या मूर्ती घडवण्याचा आवाका वाढला आहे."

मनुष्य हा एक असा प्राणी असा आहे, जो नवनवीन गोष्टी आत्मसात तर करतो. मात्र, त्याचा पर्यावरणावर काय आणि कसा परिणाम होईल याचा विचार केला जात नाही. नकळतपणे तो अनेकांचा व्यवसाय बनतो आणि त्यांचं आयुष्य त्या गोष्टीशी जोडल्या जात.

शाडूच्या मातीची मूर्ती ही एक पारंपरिक संकल्पना तर आहेच पण त्याचबरोबर ती मातीतून बनते आणि मातीतच मिसळते. ही मूर्ती म्हणजे आपल्या मातीशी असलेली नाळ आहे. ती नाळ तोडून आपण जेव्हा केवळ बाह्य आकर्षणाच्या मागे धावतो ना, तेव्हा या गणेशोत्सवाचा आत्माच हरवतो.

गेल्या काही वर्षांत अनेक लोक पर्यावरणपूरक मूर्तींचं महत्त्व समजू लागले आहेत. काही शाळा आणि संस्था तर बीजगणेश नावाचा उपक्रमही चालवतात. जिथे मूर्तीमध्ये वृक्षाच्या बिया असतात आणि विसर्जनानंतर ती मूर्ती मातीमध्ये मिसळून झाड उगवतं. हाच तर खरा "संकटहर्ता" जो निसर्ग वाढवतो.

मूर्तिकार 'दिनेश तेंडुलकर' म्हणतात, शाडूच्या मातीची मूर्ती बनवणं हे निसर्गासाठी एक आनंद आहे. मी व्यवसाय म्हणून या गोष्टी करत नाही तर, मी जेव्हा बाप्पाचे विसर्जन करायला गेलो होतो तेव्हा मी बाप्पाची विटंबना पहिली होती. ज्या बाप्पाची आपण सलग ११ दिवस मनोभावे सेवा करतो. त्याला १२ व्या दिवशी अस्ताव्यस्त अवस्थेत पाहतो. तेव्हाच ठरवलं की, आपण नैसर्गिक पद्धतीने मूर्ती बनवायची आणि पर्यावरणाला हातभार लावायचा.

गणेशोत्सव ही आपल्या संस्कृतीतील एक अनमोल परंपरा. हर्षोल्हासाने साजरा होणारा हा उत्सव फक्त धमार्चा भाग नाही, तर समाज, कुटुंब आणि निसर्ग यांच्यातील एक सेंद्रिय नातं आहे. या नात्याचा केंद्रबिंदू म्हणजे गणपती बाप्पा ज्याच्या रूपात आपण विघ्नहर्ता पाहतो, पण त्याचवेळी त्याला मातीच्या मुळाशी जोडलेलं एक रूप म्हणूनही ओळखतो. त्यामुळेच गणेशमूर्ती ही शाडू मातीपासून बनलेली असणं अधिक अर्थपूर्ण ठरतं.

शाडू माती ही एक नैसर्गिक आणि जैवविघटनशील माती असते. ती सहसा नदीकिनाऱ्यांवर किंवा तलावाजवळ सापडते आणि अतिशय मृदू, चिकटसर आणि सुलभपणे आकार घेणारी असते. त्यामुळे तिचा वापर मूर्ती बनवण्यासाठी अगदी योग्य मानला जातो.

पीओपीची मूर्ती बनवणं जेवढं सोपं आहे, त्याचप्रमाणे तिला हाताळणंही सोपं आहे. त्याउलट जर आपण शाडूच्या मूर्तीबद्दल विचार केला तर ती बनवण्यासाठी वेळ, श्रम खूप जास्त लागते. कारण ही माती हवा तसा आकार घेते मात्र, ती जेव्हा बनवून तयार होते तेव्हा तिला हाताळणं थोडस अवघड जात. त्यामुळे अनेकजण या कारणामुळे म्हणतात की, पीओपीची मूर्ती योग्य वाटते.

मात्र असे असलं तरी पर्यावरणाचा विचार करणं तितकंच गरजेचं आहे. आज ज्या वेगाने पीओपी मूर्तींमुळे जलप्रदूषण होत आहे, त्याच्या तुलनेत शाडू माती ही पर्यावरणाशी एकरूप होणारी शांत, संयमित आणि संतुलित निवड आहे.

शाडू मातीपासून बनवलेली मूर्ती पाण्यात सहज विरघळते. त्यामुळे विसर्जनाच्या वेळी पाण्यात कोणतेही रासायनिक द्रव्य, धातू, किंवा रंग मिसळत नाहीत. या मूर्तींचं विघटन काही तासांत होऊन जाते आणि त्यामुळे तलाव, नद्या यांचं प्रदूषण होण्याचा धोका टळतो. शाडू मातीमुळे जलचर प्राण्यांचं जीवन धोक्यात येत नाही आणि त्यामुळे संपूर्ण जैविक परिसंस्था सुरक्षित राहते.

याशिवाय, शाडू मातीचा वापर केल्यामुळे मूर्ती तयार करताना मूर्तिकारांमध्येही एक प्रकारची सर्जनशीलता आणि संयम टिकून राहते. पीओपी इतकी पटकन तयार होत नसल्यामुळे शाडू मातीची मूर्ती बनवताना वेळ लागतो, काळजी घ्यावी लागते आणि हीच प्रक्रिया भक्तिभाव वाढवते.

बाप्पा म्हणजे गती, पण ती गती निसर्गाशी जुळवून घ्यावी लागते, हे शाडू माती शिकवते. एक विशेष गोष्ट म्हणजे, शाडू मातीच्या मूर्तीवर वापरले जाणारे रंगसुद्धा जर नैसर्गिक असतील (हळद, गेरू, फुलांची पूड इत्यादी), तर ती मूर्ती पूर्णतः पर्यावरणस्नेही ठरते. अशा मूर्ती विसर्जनानंतरही कोणतेही पदार्थ उरवत नाहीत आणि निसर्गाला नवी ऊर्जा देतात.

या मूर्तींचा आणखी एक सकारात्मक पैलू म्हणजे घरीच विसर्जन करणे. छोट्या टाकीत, पितळी बादलीत किंवा कुंडीतही ही मूर्ती सहज विरघळते. त्यामुळे सार्वजनिक जलस्त्रोतांवरील ताण कमी होतो. काही लोक तर शाडू मातीच्या मूर्तींच्या विसर्जनानंतर उरलेली माती कुंडीत झाडांना घालतात आणि तिथून एक नवं जीवन चक्र सुरु होतं.

गणपती बाप्पा शारीरिक दृष्ट्या आपल्याला सोडून जातो मात्र तो झाडाच्या रूपात आपल्या सोबतीला कायम राहतो. शाडू माती ही केवळ मूर्ती बनवण्याचं माध्यम नाही, तर ती एक प्रकृतीशी नातं टिकवण्याची प्रक्रिया आहे. ती आपल्याला आठवतं ठेवते की गणेशोत्सव ही फक्त दहा दिवसांची सजावट नाही, तर एक शाश्वत मूल्य आहे. जिथे भक्ती, कला आणि पर्यावरण यांचा संगम होतो.

गरज केवळ पाण्याच्या शुद्धतेची नाही, तर आपली विचारधारा शुद्ध करण्याची आहे. फक्त शासकीय आदेश आणि नियम यावर विसंबून चालणार नाही. ही जबाबदारी आपली आहे, आपल्या घरातील पहिल्या आरतीपासून ते विसर्जनाच्या शेवटच्या टाळीपर्यंत.

गणेशोत्सव ही एक जबाबदारीची पूजा असायला हवी. कारण उत्सव संपतो, आरास हटते, पण निसर्गावर उमटलेला घाव मात्र वर्षानुवर्षे राहतो. त्या घावांचा परिणाम आपण पाहतो. पाण्याची गुणवत्ता घसरते, मासेमारी कमी होते, नदी-तलाव मृतप्राय होतात आणि अखेर आपल्या भविष्यात अंधार दाटतो.

आज जर आपण पीओपी मूर्ती नाकारली, तर उद्या आपल्या मुलांना शुद्ध पाणी, हरित निसर्ग आणि सुरक्षित पर्यावरण मिळेल. हीच आपली खरी गणेशभक्ती ठरेल.

■ ■ ■

## ईडीने हैद्राबाद येथील धाडीत जप्त केलेल्या सोन्याबद्दल उच्च न्यायालयाने काय सांगितले?

पूर्वी गावात इन्कमटॅक्सचे निरीक्षकसुद्धा सर्वे करत किंवा चौकशी करायला आले तर संपूर्ण बाजाराची दुकाने एक-एक करून लगेच बाजारच बंद व्हायचा, हे आजही जुन्या वाचकांना हे आठवत असेल. आज जरी ऑनलाईनचा जमाना आला तरी, इन्कमटॅक्सची घबराट करदात्याच्या मनात असतेच.

आज आपण नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात सोन्याबद्दलची अधिक माहिती जाणून घेणार आहोत.

**प्रश्न** : इडीने टाकलेल्या धाडबद्दल तेलंगाना उच्च न्यायालयाने काय सांगितले?

■ यासाठी आपल्याला Additional Director ५/२ मुसद्दीलाल जेम्स अ‍ॅण्ड ज्वेलर्स इंडिया (प्रा) लिमिटेड [2023] 151 Taxmann.com 380 (Telangana) या केसची माहिती जाणून घ्यावी लागेल.

या केसमध्ये याचिकाकर्ता मुसद्दीलाल जेम्स यांनी मा. तेलंगाना उच्च न्यायालयात याचिका दाखल केली की,

त्यांच्याकडे ए.ऊ डिपार्टमेंटने 17-10-2022 रोजी सर्च अ‍ॅण्ड सीझर म्हणजे धाड टाकली. त्यावेळी त्यांनी (प्रिवेन्शन ऑफ मनी लॉन्ड्रीग अ‍ॅक्ट) मनी लॉन्ड्रीग प्रतिबंधक कायद्याप्रमाणे जो पंचनामा केला, तो याच कायद्याच्या कलम 17 च्या विरोधात केला गेला. PMLA च्या कलम 17(1) प्रमाणे Reasons to Believe म्हणजे (विश्वास ठेवण्या योग्य कारण) असल्याशिवाय धाड टाकता येत नाही, असे स्पष्ट सांगितले. त्यांनी PMLA कायद्याच्या कलम 17(1) आणि 17(1अ) चे सविस्तर उहापोह केला.

या केसमध्ये मुसद्दीलाल ज्वेल या कंपनीच्या कार्यालयात तथा घरी आणि प्रतिवादी नं. 2 ते 4 या सर्वांच्या येथे सुद्धा धाड टाकण्यात आली व संपूर्ण कॅश/ज्वेलरी आणि इतर मौलिक वस्तू जप्त करण्यात आल्या. हायकोर्टने निर्णय देतांना सांगितले की, सर्व जप्ती मनी लॉन्ड्रीग प्रतिबंधक कायद्याच्या कलम 17 च्या उलट असून, त्यांनी Prevention of money Laundering कायदा 2002 ची जणूकाही व्याख्याच केली. प्रतिवादीलाही सर्व धाडीत सापडलेली कॅश/ज्वेलरी व इतर मौल्यवान वस्तू परत करण्याचे आदेश दिले.

या केसची माहिती अशी की ईडीने धाड टाकली असता त्यांच्या अशा लक्षात आले की 111 कोटी रुपये 2016 च्या नोटा बंदी योजनेत मुसद्दीलाल यांनी बँकेत रोख जमा केले होते. रोख व ज्वेलरी तथा इतर मौल्यवान वस्तू मिळून 150 कोटीचे घबाड सापडल्यामुळे त्यांनी सर्व 150 कोटी जप्त केले होते.

या धाडी हैद्राबाद व विजयवाडा येथे मुसद्दीलालच्या पूर्ण ग्रुपवर टाकण्यात आल्या. धाडीमध्ये डिपार्टमेंटला 149.10 कोटीची ज्वेलरी व 1 कोटी 96 लक्ष रुपये रोख सापडले होते, जे जप्त करण्यात आले होते. या शिवाय डिपार्टमेंटचे न्यायालयात म्हणणे होते की, मुसद्दीलाल यांनी बोगस नावांच्या खाली वेगवेगळ्या नोटा बँकेत नोटाबंदी योजनेखाली जमा केलेल्या आहेत. इतकेच नाही तर कंपनीचे संचालक सुकेश गुप्ता यांना अरेस्टही करण्यात आले होते. कोर्टाच्या आदेशानंतर सर्व रोख, स्टेट बँकच्या F.D. तथा मौल्यवान वस्तू परत करण्यात आल्या.




**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.

पुढील लेखमालेत आपण असेच आणखी विविध न्यायालयांचे सोन्याच्या धाडीबद्दलच्या केसेस जाणून घेणार आहोत. ज्या वाचकांना इन्कमटॅक्ससंबंधी काही प्रश्न विचारायचे असतील त्यांनी 9422218428 या नंबरवर पूर्ण नावासह व्हॉटस्‌अ‍ॅप करावे, म्हणजे त्यांची उत्तरे लेखमालेत निःशुल्क देण्यात येतील.

■ ■ ■

## शेतकऱ्यांची कर्ज मुक्ती कधी?

"जय जवान, जय किसान" हा नारा आपण अनेक वर्षांपासून ऐकत आलो आहोत. जवान देशाची सीमा राखतो तर शेतकरी आपल्या देशवासियांची भूक मिटवतो. दोघेही राष्ट्राचे खरे आधारस्तंभ आहेत. मात्र, या घोषवाक्याचा आत्मा जपला गेला का? विशेषतः शेतकऱ्याच्या बाबतीत.

सध्याच्या परिस्थितीकडे नजर टाकली, तर उत्तर स्पष्ट आहे? नाही. शेतकरी हा आजही कर्जाच्या जाळ्यात अडकलेला आहे, आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि त्याच्या समस्या केवळ राजकीय भाषणांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत.

२०२५ विधानसभा निवडणुकीत अपक्ष आमदार बच्चू कडू यांचा पराभव झाला असला तरी, त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आपली निष्ठा कायम ठेवली आहे. आपल्या पदाचा वापर किंवा गमावलेली सत्ता यापलीकडे जाऊन त्यांनी शेतकऱ्यांसाठी आंदोलनाची मालिका सुरूच ठेवली आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते, सत्ता नसली तरी लढण्याची जिद्द हवी आणि ती बच्चू कडू यांनी दाखवून दिली आहे.

राज्यातील सत्ताधारी भाजप आणि त्यांच्या नेत्यांनी निवडणुकीच्या आधी शेतकऱ्यांना अनेक आश्वासने दिली होती. त्यात सातबारा "कोरा" करण्याचे आश्वासन आघाडीवर होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी स्पष्टपणे म्हटले होते की, "आमचे सरकार आल्यावर सातबारा कोरा करू." मात्र निवडणुकीनंतर सहा महिने उलटले तरीही कर्जमाफीच्या दिशेने कोणतेही ठोस पाऊल उचलले गेलेले नाही.

दुष्काळजन्य परिस्थिती नसल्याचे कारण पुढे करत सरकारने कर्जमाफीबाबत सावध भूमिका घेतली आहे. फडणवीस यांचे म्हणणे आहे की, सध्या परिस्थिती चांगली आहे, आणि जर दुष्काळ उद्भवला तर त्यावेळी शेतकऱ्यांना अधिक मदतीची गरज असेल. त्यामुळे कर्जमाफीचा योग्य काळ पुढे येईल असा त्यांचा संकेत आहे. मात्र, शेतकऱ्याच्या व्यथेला विलंबित मदत उपयोगाची नसते झ्र ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मार्च महिन्याच्या आधी शेतकऱ्यांनी आपले कर्ज नियमित करावे, असे आवाहन केले होते. या आवाहनानंतर हजारो शेतकऱ्यांनी आपल्या घरातलं दाग-दागिने, शेतीच्या साधनसामग्री गहाण ठेवून कर्जाची परतफेड केली. मात्र, त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कर्जमाफीसाठी काही निकष लावले जाणार असल्याचे जाहीर केले. या निकषांमध्ये शेतकऱ्यांची वर्गवारी केली जाणार आहे. आर्थिक स्थिती, मालमत्ता, क्षेत्रफळ याच्या आधारे त्यांना कर्जमाफीसाठी पात्र ठरवले जाईल. ही प्रक्रिया अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक ठरते.

जे शेतकरी अतिशय हालअपेष्टा सहन करून कर्ज भरतात, त्यांना पुढे नवीन कर्ज घेणेही शक्य होत नाही. कारण, त्यांच्या नावावर पूवीर्ची कर्जमाफी लागू होत नाही आणि नवीन कजार्साठी पात्रता उरलेली नसते. हे दुष्टचक्र मोडण्यासाठी सरकारने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.

कर्जमाफीच्या मुद्द्यावर बच्चू कडू यांनी केलेली आंदोलने ही केवळ आक्रमक नव्हती, तर सर्जनशील देखील होती. आमदार यांच्या घरासमोर टेंभा आंदोलन, डफळी बजाव आंदोलन, ८ दिवसांचे अन्नत्याग, पायदळ यात्रा, मुख्यमंत्री व पंतप्रधानांना राखी बांधणे, लेटर आंदोलन, संदेश आंदोलन, आणि गावागावांत "सातबारा कोरा करणार" हे भित्तीचित्र आंदोलन झ्र यामुळे शेतकऱ्यांच्या व्यथा जनतेपर्यंत पोहोचल्या.

हे आंदोलन इतके प्रभावी ठरले की, सर्वपक्षीय पाठिंबा मिळाला. शेतकरी देखील स्वतःहून सहभागी होऊ लागले. यातून एक गोष्ट स्पष्ट झाली, शेतकरी अजूनही संघषार्साठी तयार आहे, फक्त त्याला योग्य दिशा आणि नेतृत्व हवे.

बच्चू कडू यांच्या अन्नत्यागानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंधरा दिवसांत समिती गठीत करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, आधी समिती गठीत करण्यासाठी विलंब त्यात समिती गठीत होऊन एका महिन्याचा कालावधी उलटूनही समितीचे काम कुठे पोहचले आहे याची कोणतीही माहिती उपलब्ध नाही. या प्रकारामुळे सरकारच्या गंभीरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

सौ. अश्विनी डकरे
९९७५८४४६३८

येत्या जिल्हा परिषद आणि महानगरपालिका निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांचा प्रश्न केंद्रस्थानी असणार हे निश्चित. यामुळेच चर्चेला उधाण आले आहे की, निवडणुका जवळ येताच सरकार पुन्हा तात्पुरत्या स्वरूपात कर्जमाफी जाहीर करणार का?

सरकारकडून कर्जमाफीचा विषय जाणीवपूर्वक लांबवण्यात येतोय का, हा शंका अनेकांना वाटू लागली आहे. यामागील कारण म्हणजे, कर्जमाफीचे श्रेय बच्चू कडूंना मिळू नये ही सत्ताधाऱ्यांची भीती. मात्र, या राजकीय श्रेयवादामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे हे विसरले जात आहे. आंदोलन करणारा नेता हिरो होतो म्हणून जर निर्णय लांबवले जात असतील, तर ती लोकशाहीची विटंबना आहे.

जेव्हा उद्योगपतींच्या कर्जमाफीत कोणतेही निकष लागत नाहीत, त्या वेळी शेतकऱ्यांसाठी इतके नियम आणि अटी का? शेतकरी देशासाठी उत्पादन करतो, परिश्रम करतो, जीव गमावतो. मग त्याच्यावर एवढा अन्याय का?

शेतकऱ्यांची आत्महत्या ही केवळ वैयक्तिक घटना नाही, ती संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित करते. म्हणून शेतकऱ्याला निकषांविना, सन्मानपूर्वक आणि स्थायिक स्वरूपात कर्जमुक्ती देणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

कर्जमाफी ही एक अल्पकालीन उपाययोजना आहे. खरी गरज आहे, शेतकऱ्याच्या उत्पन्नाला शाश्वत स्थैर्य देण्याची. यासाठी खालील गोष्टी तातडीने राबवणे गरजेचे आहेः

स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींचे पूर्ण पालन.
उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देणे.
मध्यम व अल्पभूधारक शेतकऱ्यांना विशेष योजना
रोजगार हमी योजनेचा विस्तार ग्रामीण भागात
शेतीपूरक उद्योगांना चालना देणे
शेतीसाठी व्याजमुक्त किंवा अल्पदरातील कर्जयोजना
नवीन तंत्रज्ञान, सिंचन साधने सुलभ करणे
शेतकऱ्यांच्या विमा योजनांचा प्रभावी अंमल
पीक विमा योजनेत पारदर्शकता

**शेतकरी वाचला तरच राष्ट्र वाचेल**

शेवटी, हा प्रश्न केवळ एका आंदोलनाचा, एका आमदाराचा, एका सरकारचा नाही. हा प्रश्न आहे भारताच्या मूलभूत अस्तित्वाचा. शेतकरी जगला तरच आपण जगू. अन्यथा, शेती ही व्यवसाय राहणार नाही, तर एक दुःस्वप्न बनून राहील.

राजकारणी येतात आणि जातात, परंतु शेतकरी कायमस्वरूपी देशाच्या अन्नसाखळीत कार्यरत असतो. त्यामुळे त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाला विरोध करणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

■ ■ ■

## पोळा : बैलांप्रती कृतज्ञतेचा दिवस!



महाराष्ट्रात पोळा श्रावण मासातील अमावास्येला साजरा केला जातो. बैलांचा उत्सव म्हणजे पोळा! बैल हा शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा सोबती! कारण नांगरणीपासून ते पेरणी, दळणवळण यासाठी बैल शेतकऱ्याला मदत करतो. त्याच्या श्रमामुळेच शेतकऱ्याला पीक घेता येते. म्हणूनच बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची पूजा करून हा सण साजरा केला जातो.

या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना आंघोळ घालून, त्यांना तेल चोळून, सुंदर सजवून मिरवणुकीसाठी नेतात. बैलांच्या शिंगांना रंगवून, गळ्यात गजरे व गोंडे घालून, गोड पदार्थ खाऊ घालून त्यांचा सन्मान केला जातो. या दिवशी बैलांना कामावर लावले जात नाही. बैलांनी केलेल्या कष्टाचे स्मरण करून त्यांची पूजा केली जाते.

या दिवशी गावोगावी बैलांच्या मिरवणुका काढल्या जातात. शेतकरी बांधव एकत्र येऊन आनंदाने हा उत्सव साजरा करतात.

**वाचक लिहितात**

एकंदरीतच पोळा हा शेतकऱ्याच्या कष्टकरी बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, निसगार्ची पूजा करण्याचा आणि समाजात एकोपा वाढविण्याचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून प्राण्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य अधोरेखित होते.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा

## भारतात डायबिटीजचा वाढता धोका १० पैकी ४ जणांना समस्या



आपल्या देशात अनेक आजारात शरीरात गुपचुप शिरकाव करीत हळूहळू तेथे बस्तान मांडत आपले आरोग्य संकटात आणत आहेत. डायबिटीज देखील त्यापैकी एक आहे. अनेक लोक यास गांभीयार्ने घेत नाहीत. नंतर मोठी समस्या बनल्यानंतर त्याकडे त्यांचे लक्ष जाते. अलिकडेच लॅन्सेटमध्ये प्रकाशित एका अभ्यासात आश्चर्यकारक खुलासा झाला आहे. भारतातील १० पैकी ४ जणांना त्यांना डायबिटीज असल्याचे माहिती नसल्याचे उघडकीस आले आहे.

हा अभ्यास २०१७ ते २०१९ दरम्यान ४५ हून अधिक वयोगटाच्या व्यक्तींवर करण्यात आला.यात आढळले की या वयोगटातील २० टक्के लोक डायबिटीजने पीडीत आहे.

पुरुष आणि महिला, दोघांमध्ये याचे प्रमाण जवळपास सारखे आहे. अभ्यासात हे देखील पुढे आले आहे की शहरी भागात डायबिटीजच्या रुग्णांची संख्या ग्रामीण क्षेत्राच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. याचे कारण जीवनशैली, खाण्याच्या सवयी आणि शारीरिक हालचालींची कमतरता मानले जात आहे.

**भारतात डायबिटीजची गंभीर स्थिती**

भारतात २० ते ७९ वयोगटातील व्यक्तींमध्ये डायबिटीजच्या रुग्णांची संख्या जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.२०१९ मध्ये भारतात झालेल्या एकूण मृत्यूमध्ये सुमारे ३ टक्के मृत्यू डायबिटीजने झाले आहेत. याच बरोबर उच्च रक्तदाबाच्या रुग्णांची संख्या देखील वेगाने वाढत आहे.

दोन्ही आजार जर वेळीच ओळखून नियंत्रित केले नाही तर ते हृदय, किडनी आणि डोळ्यांच्या गंभीर समस्येचे कारण बनू शकतात.

**गावात उपचाराची अनुपलब्धता**

अभ्यासात असे उघड झाले आहे की भारताच्या ग्रामीण क्षेत्रात डायबिटीज आणि हायब्लडप्रेशरच्या उपचाराची सुविधा खूपच कमजोर आहे. क्ठटफ आणि हल्ड द्वारा सात राज्यांच्या १९ जिन्ह्यात केलेल्या सर्वेक्षणात कळाले की केवळ ४० टक्के सब-सेंटर्स या आजारांवर उपचारासाठी तयार आहेत.

एक तृतीयांश केंद्रात डायबिटीजचे औषध मेटफॉर्मिन उपलब्ध नव्हते. जवळपास अर्ध्या केंद्रांवर ( ४५ टक्के ) उच्च रक्तदाबावरील एम्लोडिपिन औषधांचा कमतरता

**अटकाव आणि वेळीच निदान गरजेचे**

डायबिटीज आणि हायब्लड प्रेशर दोन्ही असे आजार आहेत. ज्यात वेळेत निदान आणि योग्य औषध घेतले तरच तो नियंत्रणात येतो. सुरुवातीचे निदान, संतलित आहार, नियमित व्यायाम आणि वेळेवर औषधे घेतली तरच या आजारात होणाऱ्या गंभीर नुकसानाला रोखता येते.

■ ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## गीता सार

गीताग्रंथ घ्यावा
डोक्यामधी
होईल जीवनाचे
सार्थक
जयहो म्हणूनी
घेणे डोक्यावर
आहे केवळ निरर्थक..

कर्मफलाच्या सिंद्धाताची
हीच आहे शिकवणी
तरच उर्वरीत आयुष्यात
बसेल जीवनाला
कलाटणी...

# आचार्य विनोबा भावे ग्रामीण हॉस्पिटलमध्ये कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्राम
## महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी वरदान



**यवतमाळ, १७ ऑगस्ट :** सावंगी येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण हॉस्पिटल (एव्हीबीआरएच) मधील, कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्रामने ३० जुलै २०२५ रोजी आणखी एक मोठे यश मिळवले. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत आणखी दोन मुलांना ऐकण्याची देणगी मिळाली.

यामध्ये वाशीम येथील दोन वर्षांची अर्वी नरवडे आणि यवतमाळ येथील दोन वर्षांची रुतुजा फुलतनकर या दोन्ही मुलांचा समावेश आहे. त्यांना गंभीर श्रवणबाधा असल्याचे निदान झाले होते. संपूर्ण श्रवण चाचणी (ऑडीओलॉजिकल)आणि वैद्यकीय तपासणीनंतर त्यांची कॉक्लिअर इम्प्लांटसाठी निवड करण्यात आली. ही शस्त्रक्रिया डॉ. श्रद्धा जैन, प्रोफेसर आणि डिपार्टमेंट ऑफ ओटोरायनोलेरिंगॉलॉजीच्या प्रमुख यांच्या नेतृत्वाखालील समर्पित ईएनटी टीमने केली, ज्यांना डॉ. जयश्री सेन यांच्या नेतृत्वाखालील ॲनस्थेसियोलॉजी टीम आणि डॉ. अशिष दिसवाल यांच्या नेतृत्वाखालील ऑडिओलॉजी टीमने साथ दिली. शस्त्रक्रिया सुरळीत पार पडली आणि दोन्ही मुले आता शस्त्रक्रियेनंतरच्या पुनर्वसनामुळे बोलणे आणि संवाद कौशल्ये विकसित करण्याच्या मार्गावर आहेत.

या प्रोग्रामअंतर्गत आतापर्यंत एकूण १३ यशस्वी कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया पूर्ण झाल्या असून, आचार्य विनोबा भावे ग्रामीण हॉस्पिटल हे प्रगत श्रवण उपचारासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जात आहे. हा प्रोग्राम ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करतो, जेणेकरून आवाज ऐकण्याची संधी भौगोलिक किंवा आर्थिक परिस्थितीवर अवलंबून राहणार नाही.

कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्राम आणि त्याच्या समर्पित टीमने दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च टीमच्या सातत्यपूर्ण पाठबळासाठी आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वासाठी मनापासून आभार मानले. ईएनटी उपचारात नाविन्यपूर्ण उपक्रम आणणे आणि लहानपणीच लवकर ऐकण्याच्या उपचाराला प्राधान्य देणे या गोष्टींमुळे हा प्रोग्राम महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी आशेचा किरण ठरला आहे. दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च आणि अदाणी फाऊंडेशन यांच्यातील अलीकडील सहकार्यामुळे कॉक्लिअर इम्प्लांट प्रोग्राममध्ये अधिक प्रगती होण्याची आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील श्रवणदोष असलेल्या मुलांपर्यंत सेवा पोहोचवण्याची अपेक्षा आहे, जेणेकरून प्रत्येक मूल ऐकू शकेल, बोलू शकेल आणि त्यांना प्रगती करण्याची संधी मिळेल.

# अदाणी डिजिटल लॅब्सने एअरपोर्ट आणि प्रवासाचा अनुभव सुधारण्यासाठी मोठे बदल

**अहमदाबाद, १७ ऑगस्ट :** अदाणी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेडची टेक्नॉलॉजी शाखा अदाणी डिजिटल लॅब्स (एडीएल) ने अनेक मोठे बदल जाहीर केले आहेत. यामध्ये देशभरातील अदाणी व्यवस्थापित एअरपोर्टवर प्रवाशांचा अनुभव अधिक सोयीस्कर, आरामदायक आणि आनंददायी करण्यावर भर देण्यात आला आहे. या उपक्रमामुळे अदाणी एअरपोर्ट्स एव्हिएशन सेक्टरमध्ये डिजिटल इनोव्हेशनमध्ये आघाडीवर राहतील आणि नव्या रुपातील वनॲप व डिजिटल लाउंज एअरपोर्ट हॉस्पिटॅलिटीमध्ये नवीन मापदंड निर्माण करतील.

अदाणी डिजिटल लॅब्सच्या संचालिका सृष्टि अदाणी म्हणाल्या, नवीन एडीएल टीममध्ये ऊर्जा, नवे विचार आणि उत्तम अनुभव यांचा समावेश असेल. प्रवाशांना डिजिटल-फर्स्ट अनुभव देण्याच्या आमच्या मोठ्या योजनेचा हा पहिला टप्पा आहे. प्रत्येक प्रोजेक्टमध्ये आमचे उद्दिष्ट प्रवाशांच्या प्रवासातील अडचणी कमी करणे आहे. यात रिअल-टाइम माहिती, आकर्षक रिवॉर्ड्स आणि खास लाउंज सेवा असतील, ज्या नेहमीच्या सोयींपेक्षा जास्त सुविधा देतील आणि प्रत्येक प्रवाशाला वैयक्तिक अनुभव देतील. त्यामुळे आमच्या एअरपोर्टवर प्रवास करणे आनंददायी होईल.

विकास आणि इनोव्हेशनबद्दलची आपली वचनबद्धता दाखवत एडीएलने अहमदाबादमध्ये १५० सीट्सचे नवे ऑफिस सुरू केले आहे. इथून टीम प्रवाशांच्या सोयीसाठी कस्टमर-सेंट्रिक सोल्यूशन्स तयार करेल. हे सोल्यूशन्स प्रवासादरम्यान वेळेची कमतरता, सुविधा माहिती न मिळणे आणि लांब रांगा यांसारख्या अडचणी दूर करतील. सर्व सेवा एका डिजिटल प्लॅटफॉर्मवर म्हणजेच अदाणी वनॲप वर उपलब्ध करून, प्रवासाचा अनुभव केवळ व्यवहारापुरता न ठेवता तो अधिक वैयक्तिक, सोपा आणि परिणामकारक केला जाईल.

# ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पंजाब नॅशनल बँकेने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न





**नागपूर, १७ ऑगस्ट :** १५ ऑगस्ट रोजी ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त विभागीय कार्यालय, नागपूरने स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय दिलीप कुमार काप्री, विभागीय प्रमुख, पंजाब नॅशनल बँक, विभागीय कार्यालय, नागपूर यांनी ध्वजारोहण करून केले. याप्रसंगी दिलीप कुमार काप्री, उपविभागीय प्रमुख, शैलेंद्र गुप्ता, मुख्य व्यवस्थापक, शाखा कार्यालय, किंग्सवे यांनी पीएनबी विभागीय कार्यालयाच्या आवारात एक रोप लावले आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. उपविभागीय प्रमुख शैलेंद्र गुप्ता म्हणाले की, आपल्या भावी पिढ्यांना स्वच्छ वातावरण देण्यासाठी आणि निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी सर्व नागरिकांनी एक झाड लावले पाहिजे. पंजाब नॅशनल बँक नेहमीच पर्यावरण संतुलनासाठी वचनबद्ध आहे. यापूर्वी देखील एपीएमसी कळमना येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये पीएनबीने ५०० हून अधिक रोपे लावून हिरवे वातावरण, स्वच्छ पर्यावरणाचा संदेश दिला होता. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात बोलताना श्री दिलीप कुमार काप्री जी म्हणाले की, या वर्षाची थीम 'नवीन भारत' आहे. या थीमचा उद्देश २०४७ पर्यंत समृद्ध, सुरक्षित आणि स्वावलंबी भारत निर्माण करण्याचा संकल्प बळकट करणे आहे. हे सरकारच्या विकसित भारत व्हिजन चे प्रतीक आहे, जे प्रत्येक नागरिकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडण्यावर भर देते. ते म्हणाले की, आजचा दिवस आपल्याला एकत्र येऊन आपल्या देशाप्रती असलेली आपली कर्तव्ये पूर्ण करण्यास प्रेरित करतो. आपण आपला सांस्कृतिक वारसा, आपली मूल्ये आणि आपले आदर्श यांचे रक्षण करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. स्वातंत्र्यदिनी, आपण सर्वांनी अशी प्रतिज्ञा करूया की आपण आपल्या देशाला प्रत्येक क्षेत्रात पुढे नेण्यासाठी आणि त्याच्या प्रगतीत सक्रिय भूमिका बजावण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध राहू. आपण मातृभूमीप्रती असलेली आपली कर्तव्ये देखील लक्षात ठेवली पाहिजेत. आपण अशी प्रतिज्ञा करूया की आपण आपल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्वप्नांचा भारत, समृद्ध, शक्तिशाली आणि जगाच्या आघाडीवर असलेला भारत निर्माण करू. आपल्या समाजाच्या आणि देशाच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्न करणे आणि आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडणे हे आपले कर्तव्य आहे. स्वातंत्र्यदिनी, कर्मचाऱ्यांनी रंगारंग कार्यक्रम सादर केला आणि स्वातंत्र्यदिनानिमित्त श्री. दिलीप कुमार कापरी जी यांनी आयोजित केलेल्या ऑनलाइन राजभाषा आणि सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे आणि बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजभाषाचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. नवीन जाधव यांनी केले.

# ३१ ला आकाश आनंद मुंबईत संघटन समीक्षा व प्रशिक्षण शिबिर घेणार



**नागपूर, १७ ऑगस्ट :** बहुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा बहन मायावतीजी यांचे उत्तराधिकारी व बसपाचे राष्ट्रीय कोऑर्डीनेटर आकाश आनंद हे ३१ ऑगस्ट रोजी मुंबईत येणार असून महाराष्ट्र प्रदेश बसपाची संघटन समीक्षा घेऊन राज्यातील बसपाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करणार आहेत.

मुंबईच्या चर्चगेट जवळील के सी कॉलेज ऑडिटोरियम मध्ये दिवसभर होणाऱ्या संघटन समीक्षा व प्रशिक्षण शिबिराला आकाश आनंद सोबतच प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यसभा खासदार व महाराष्ट्र प्रदेश प्रभारी राजारामजी, प्रदेशाध्यक्ष एड सुनील डोंगरे, स्थानिक प्रदेश प्रभारी डॉ संतोष शिंदे, डॉ रामचंद्र जाधव प्रामुख्याने उपस्थित राहतील.

या ऐतिहासिक प्रशिक्षण शिबिराला प्रदेश, झोन, जिल्हा, विधानसभा, सेक्टर स्तरावरील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले आहे.

# मी असा कसा...?

ज्येष्ठ पटकथा व संवाद लेखक सलीम खान यांचा एक व्हिडिओ मागे पाहण्यात आला होता. त्यात ते हातरुमालाच्या आधारे मानवी जीवन समजावून सांगत होते. ते म्हणत होते, जीवन म्हणजे या रुमालाचे दोन टोकं आहेत, ज्यातील एक टोक सुरुवात तर एक टोक शेवट आहे. ना सुरुवात (जन्म) आपल्या हाती आहे न शेवट (मृत्यू), मग मधले जे थोडेसेच आहे त्याचा काय एवढा घमंड करायचा. हे जरी एक छोटेसे उदाहरण वाटत असले तरी त्यात जीवनाची पूर्ण पटकथा आहे जी आपल्याला दिसूनही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो आणि पाहता-पाहता अंतिम छोर कधी येऊन सुटतो हेच कळत नाही. माणूस असेपर्यंत त्याची किंमत अन त्याचे अस्तित्व असते. तो गेल्यानंतर मोठं मोठ्यांना लोकं विसरतात तिथे सर्वसामान्य अतिसामान्य होऊन जातात. तरीसुद्धा या नश्वर जीवनाचा अंत माहिती असताना आणि तो कधीही येईल याची काहीच शाश्वती नसताना आम्ही मात्र असे वावरतो जसे काही हा जन्म कधी संपणारच नाही. अगदी आयुष्याचा शेवटचा पाडाव चालू असणारे देखील असे नियोजन करत राहतात जसे आणखी चार- दोन दशके ते जगतील. मग त्यासाठी किती जणांना दुखावले हे पाहत बसत नाहीत. या गुरफटण्यात मृत्यू कधी आला ते पण कळत नाही. खरे पाहयाला गेले तर मेल्यानंतर माणूस एक निर्जीव वस्तू आहे. निसर्गातला शून्य मूल्य असलेला दगडाहून कमी महत्वाचा एक निर्जीव अंश. त्यामुळे तो जोपर्यंत बोलतो तोपर्यंत आपला. बोलणारी जिव्हा आटली की तो निसर्गाचा. मुळात आपण आहोतच त्या निसर्गातले आणि जाणारही तिथेच. पण इथे आल्यावर जी भौतिक सुखाची गरमी आता घुसते ती मरेपर्यंत काही बाहेर निघत नाही.

या जीवनात सर्वच परिमाणे आहेत. काही तोलून मापून आहेत तर काही अस्ताव्यस्त. या परिमाणात सकारात्मक आणि नकारात्मक दोन्हीही तितकेच. यातला जर सर्वात जास्त अन नाहक असेल तर तो अवास्तव घमंडाचा टक्का आहे. चार पैसे जवळ येवो की मिळालेली थोडीशी प्रतिष्ठा अन पद, लोकं जमीन सोडायला अन उडायला तत्परच असतात. ज्यांच्या जीवावर आणि ज्यांच्या कसरतीने हे जे उडले त्यांनाच हे पाण्यात पाहायला लागतात. आपण ज्यांच्यामुळे आहोत आणि ज्यांचा अभिमान आहोत त्यांनाच का कमी लेखायचे? हे न कळणारे असे कित्येक बेअक्कली याच समाजात आहेत. मुळात ते भूषण म्हणून तुम्हाला सगळीकडे गाजवतात. तुमचे आभूषणे ते तयार करतात. पण त्यांचीच पायमल्ली करून लाभणारे समाधान हे अत्यंत कुचकामी राहणार. हे कधी कळणार? जगात घमंड करावा असा एकच असणार जो सर्वाधिक शक्तिशाली, धनाने व प्रतिष्ठेने असणार. बाकी सर्व त्याच्या मागे. कारण मी माझ्या चार मित्रात व तितक्याच नातेवाईकांत मोठा असेल तर मोठा नाही. जगात ज्याची नोंद होणार नाही त्या नोंदविरहित परिघातला मी अतिसामान्य ठिपका. तोच ठिपका इतका भपका मारत असेल तर हे गर्व करावे इतके पर्व यायला जन्मोजन्मी मानव म्हणून जन्मावे लागेल तरीही तो कळस काही गाठता यायचा नाही.

कोणाकडे कितीही पैसा अन कितीही प्रतिष्ठा असो ती ज्याची त्याचीच असते. उगाच आपण मागे लागतो म्हणून कशातलेच चार आणे आपले होत नाहीत. कोणाकडे काही आहे म्हणून कोणी त्यांच्या मागे धावत पण नसते. माणूस चांगला तर जग चांगले. त्या चांगल्या गोष्टींचा चांगुलपणा सगळ्यांनी तो करावा आणि बाळगावाही. पण जेव्हा मीच मोठा व मोठा शहाणा होतो, तेव्हा गर्विष्ठपणा जन्म घेतो. नंतर तोच आपल्या अंताचे कारणही होतो. त्याच्या आधारे जीवन थोडे जगता येईल. यापुढे कोणी कितीही जवळ यावे म्हटले तरी ते आपल्याकडे सरकणार नाही अन तुम्ही तर इतके अहंमी होऊन गेलेले असणार की तुम्हाला कोणाला जवळ बोलावेही वाटणार नाही. माणूस बोलतो म्हणून माणूस नाहीतर तो जनावरच! पण हेच कौशल्ये आपण वापरत नसू तर मीठ नसलेले अन्न जसे तसे जीवन निरस होईल. अनेक आरोग्याच्या समस्येत मिठविरहित जेवण करावे लागते तसे बेचव जगणेही आपल्या घमेंडीमुळे येऊ शकते. सगळे निस्तेज दिसत असले तरी बदलणे तेव्हा आपल्या हाती राहत नाही. म्हणून जगताना जपून टाकलेले पाऊल कधीही चांगलेच.

बेहिशोबी संपत्ती जमवताना सहज आपण लोकांचे सोपे हिशोब चुकवतो. तेव्हा कोणाचा गळा किती दाबला अन कसा दाबला याची नोंद कुठेच राहत नाही. थोडक्यांना खुश करताना अनेकांना दुखवणे हे सहज होऊन जाते. जे अनेक अनेकांचे तारणहार असतात त्या अनेकांचे पाप आपल्याला लागत असते. मुळात पाप - पुण्य ते काय! ज्याची ना नोंद आहे ना हिशोब. लोकं म्हणतात व जनमानसात हिशोब होतो म्हणून ते परिमाप मांडायचे म्हणून मांडले. जसे कितीही श्रीमंत असो त्याला लोकशाहीत मत एकच गरिबसारखे तिथे लुटणारे व लुट होणारे, जगणारही तितकेच; चार दोन वर्षे मागे पुढे काय ते! सुखाची व्याख्या जर स्व- पुरतीच असेल तर निर्भेळ समाज व सात्विक प्रेम अस्तित्वात आले नसते. पण हव्यासापायी आपण ते जगणे व शोधणे सोडून दिले. सगळे असताना सगळ्याच बिमाऱ्या होत असतील तर ते सुख आपल्याला मिळाले नाही एवढेच कळते. प्रत्येकवेळी गळचेपी करणे, धांदली करणे, फसवणूक करणे सोडायला हवे. जो मला श्वास आहे तो त्याला मिळावा इतके खुले कधी तर व्हायला हवे. शेवट तर आहेच. शेवटी असो की आयुष्याच्या मधी तो चुकणार थोडा आहे. पुनर्जन्म तर कपोलकलपित आहे. जगायचे व खरे जगायचे एकदाच असताना नाही त्या भानगडीत पडण्याला काहीच अर्थ नाही.

किती जगलो
यापेक्षा कसा जगलो
हे महत्वाचे
जिथे सगळेच जाताहेत
तिथे काही करोडतले
तुम्हीही तितकेच

**लेखक**
**अमोल चंद्रशेखर भारती,**
**नांदेड**
**मो. ८८०६७२१२०६**

# महाराज बागेत २ तास खुली डुकरे

**नागपूर, १७ऑगस्ट :** १५ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान मी माझ्या मुलीला घेऊन महाराजबाग येथील प्राणी संग्रहालयाला भेट दिली. मच्छालयाला भेट देऊन पशुपक्षांकडे जात असताना रस्त्याशेजारी एक पांढऱ्या रंगाचा गावरान डुक्कर व त्याची तीन पिल्ले दिसली. त्याची माहिती स्थानिक गार्ड, महिला पोलीस व पोलीस कंट्रोलला दुपारी १२.३० च्या दरम्यान दिली. त्याचे फोटो व व्हिडिओ सुद्धा पाठविले. परंतु दुपारी २ वाजेपर्यंत त्या डुकरांचा शोध घेण्यात पोलीस व स्थानिक महाराजबाग प्रशासन नाकामी ठरले. आपले प्रशासन किती नाकर्ते आहे याचा प्रत्यय आला.



हे डुक्कर पाहताच माझी मुलगी घाबरली, अनेक मुलंही घाबरली, मी त्याचे फोटो काढून तिथल्या एका गार्ड ला हा डुक्कर येथे फिरणाऱ्या मुलांना वगैरे नुकसान पोहोचू शकतो असे सांगितले. त्यावर हे माझे काम नाही, मी पॉईंट सोडत नाही, तुम्ही कार्यालयात तक्रार करा, असे सांगितले. येथे चार महिला शिपायांचा ग्रुप येताना दिसला त्यांना थांबा मला तक्रार करायची आहे, असे म्हणताच त्यातील फक्त एक शिपाई थांबली, त्यांना हा प्रकार सांगितल्यावर त्यांनीही महाराज बागेच्या कार्यालयात जाऊन तक्रार करण्याचा सल्ला दिला.

नंतर मी पोलीस कंट्रोल रूमला फोन केल्यावर माझीच सविस्तर इन्क्वारी करत बसले. आणि डुकराचा तुम्हाला काय त्रास आहे? ते कुणाला चावत आहेत का? हे सुद्धा विचारले, मी स्थानिक नागपुरातील पोलीस कंट्रोलला फोन केल्यावर त्यांनी तिथे असलेल्या शिपायाला सांगण्याचे सुचविले, त्यानंतर त्यांनी संबंधितांना कळवतो असे बोलले, नंतर बर्डी पोलिसांचा फोन आला, तुम्ही कुठे आहात, डुक्कर कुठे आहेत? त्याचे फोटो व्हिडिओ, पाठवा अशी सूचना केली.

पुन्हा त्यांना मी दीड तासानंतर म्हणजेच २ वाजता त्या डुकराचे जिवंत व्हिडिओ व फोटो पाठविले. त्यानंतर पोलीस आणि महाराजबाग प्रशासनाचे गार्ड शोध मोहिमेवर निघाले. म्हणजे दीड तास पर्यंत हजारो लोक असलेल्या महाराज बागेत दीड तास पर्यंत डुकरांचा व त्यांच्या पिल्लाचा सर्रास वावर असतो. तोपर्यंत त्याचा प्रतिबंध केल्या जात नाही. किंवा त्यांचा प्रतिबंध करणारी यंत्रणा महाराज बागेकडे उपलब्ध नाही, जर ती डुकरे पिसाळलेली असती किंवा जर त्यांनी आपल्या पील्लूयाच्या संरक्षणात हल्ले केले असते तर कित्येक मुलं जखमी झाली असती. जर एखाद्या वेळेस वाघ सुटला तर त्याचा बंदोबस्त करणारी यंत्रणा महाराज बागेकडे आहे काय? असा प्रश्न बसपा नेते उत्तम शेवडे यांनी प्रशासनाला विचारला आहे.


## आज का अंदाज

**सोमवार १८ ऑगस्ट २०२५**
**जबरदस्त पास होणारे चान्सेस**
**पत्थर फोड एकच**

**कल्याण बाजार**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 6 | 9 |
| 147 | 120 | 790 | 450 |
| 390 | 229 | 880 | 559 |
| 200 | 300 | 600 | 667 |
| 21 | 31 | 60 | 90 |
| 24 | 34 | 65 | 95 |
| 27 | 37 | 68 | 98 |

**मुंबई बाजार**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 5 | 6 | 7 |
| 110 | 456 | 367 | 179 |
| 228 | 690 | 268 | 359 |
| 336 | 780 | 169 | 890 |
| 20 | 50 | 61 | 71 |
| 29 | 59 | 63 | 73 |
| 28 | 58 | 64 | 74 |

**१८ ऑगस्ट २०२५**
**सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 75 | 85 |
| 12 | 42 | 79 | 89 |
| 16 | 46 | 73 | 83 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
**प्रो. बालाजी कुमार**
**9822486034**


## राशीभविष्य

**मेष :** एखाद्या कायदेशीर प्रकरणात तुम्हाला अनुभवी व्यक्तीची मदत घ्यावी लागेल. तुमच्या वडिलांचे बोलणे तुम्हाला वाईट वाटू शकते, पण ते तुमच्यासाठी फायद्याचे असेल.

**वृषभ :** आज कामातील चुका सुधारून व्यवसायात वाढ करायची संधी मिळेल. तुमच्या जुन्या चुकांमधून शिका. जर तुम्ही कर्ज घेतले असेल, तर ते फेडण्याचा प्रयत्न कराल. पैसे वाढल्यामुळे खूप आनंदी असाल.

**मिथुन :** आजचा दिवस प्रगतीसाठी उत्तम असेल. तुमची काम करण्याची क्षमता चांगली राहील. कोणताही जुना आजार असेल, तर त्यात आराम मिळेल. मनासारखे काम मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क :** काम पूर्ण होईपर्यंत त्यावर चर्चा करू नका. कामाच्या ठिकाणी कामाचा ताण वाढू शकतो. तुम्ही सामाजिक कार्यक्रमांमध्ये भाग घ्याल, जिथे तुमची नवीन लोकांशी ओळख होईल.

**सिंह :** आज तुम्ही सकारात्मक विचार ठेवा. कारण तुमच्या चांगल्या विचारांमुळे तुम्ही तुमच्या शत्रूंवर मात करू शकता. तुम्हाला तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. तुम्ही लोकांचे भले कराल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा त्रासदायक असेल. नोकरीमुळे तुम्ही काळजीत असाल. तुम्हाला दुसरी नोकरीची ऑफर येऊ शकते, पण सध्याची नोकरी सोडू नका. पैसे वाचवण्यावर भर द्या.

**तूळ :** प्रवासाला जाताना तुमच्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्या. तुमची कामे उद्यावर ढकलू नका. दुसऱ्याच्या बोलण्यामुळे काम बिघडू शकते. राजकारणात मोठ्या नेत्याला भेटण्याची संधी मिळेल.

**वृश्चिक :** महत्त्वाची माहिती कोणासोबत शेअर करू नका. घर आणि बाहेरच्या कामांमध्ये समतोल ठेवा. नाहीतर घरातील लोक नाराज होऊ शकतात. तुमचे अडकलेले पैसे तुम्हाला परत मिळू शकतात.


**धनु :** आज तुमच्या खर्चाकडे लक्ष द्यावे लागेल. तज्ञाचा सल्ला घेतल्याशिवाय शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवू नका. मुलांच्या वागणुकीमुळे तुम्हाला काळजी वाटेल. भागीदार तुम्हाला धोका देऊ शकतो.

**मकर :** बचतीच्या योजनांमध्ये गुंतवणूक कराल. तुम्ही नवीन घर किंवा दुकान खरेदी करू शकता. तुमच्या शेजारच्या लोकांशी चांगले संबंध ठेवा. जर कोणाला पैसे दिले असतील, तर ते तुम्हाला परत मिळू शकतात.

**कुंभ :** आज मन थोडे अस्वस्थ असेल. कारण तुमच्या डोक्यात अनेक गोष्टी सुरू असतील. तुम्ही एखादी गोष्ट गुप्त ठेवली असेल, तर ती कुटुंबासमोर उघड होऊ शकते.

**मीन :** आजचा दिवस आनंदाचा असेल. तुम्ही नवीन घर घेऊ शकता, ज्यामुळे घरात आनंद राहील. तुमच्या जोडीदारासोबतचे संबंध चांगले होतील, पण तुमच्या बॉसला तुमचे बोलणे आवडणार नाही.

## शब्दकोडे क्रमांक २१९४




**आडवे शब्द :-**
१) आपले राष्ट्रीय गीत
५) स्त्री
६) अग्रलेख
१०) रक्तवाहिनी
११) तृण
१३) नवरदेव
१४) मादीच्या विरुद्ध
१६) निरुपयोगी
१८) मदन
२१) द्रव्य, धन
२२) विजार
२५) कडक व चिवट
२६) सारखा
२७) कमीशन, बट्टा
२८) प्राचीन
३०) पूर्ण बदल
३२) गाव
३४) गाढव
३५) एक चर्मवाद्य
३७) उपवासाला चालेणारा एक कंद
३८) मोठी वाटी
४०) शंकर
४१) च्या साठी
४३) वस्तरा
४५) खेकडा
४७) मवाळ धोरण
५०) जंगलाला लागलेली आग
५२) गंध
५४) राजा
५५) डाका
५७) थान
५९) खराब
६१) ममता, आपलेपणा
६३) नाश, प्रलय
६५) डोंगरातून आरपार गेलेला रस्ता
६७) एकूणएक, सर्व
६८) लाज
७०) ज्यास जहागीर मिळाली आहे असा
७५) साधारण
७६) पातळसर
७९) पाठविलेला
८१) साळी
८२) गज, वारण
८३) होडी
८४) न घाबरणारा

**उभे शब्द :-**
१) नमस्कार
२) रोग पसरविणारा किटक
३) निष्णात
४) सुसर
५) वार्ता
७) शुद्ध, पवित्र
८) प्रत्येक, भाव
९) उचित, योग्य
१२) खूण इशारा
१५) धपाटा
१७) मतलबापुरते नाते
१९) नूतन
२०) ताबडतोब
२१) कैफ, उन्माद
२३) मुसलमान
२४) धोका
२६) समतल
२७) लग्नासाठी जमलेली नात्यातील मंडळी
२९) माणूसघाणा, मत्सरी
३१) धडक
३३) मगज
३६) नष्ट, खाऊन संपविणे
३९) हवेतील थंडावा
४०) मिठाई तयार करणारा
४२) सिंह
४४) वाळवंट
४६) रतांबीचे साल
४८) पराग
४९) मुस्लीमांचा एक सण
५१) चौकशी
५३) सटवाई, दुष्ट स्त्री
५६) प्रत्येक दिवशी
५८) ** दमयंती
६०) उदबत्ती
६१) आंब्यातील द्रवपदार्थ
६२) माकड
६४) नवरा
६५) रेल्वेचा डबा
६६) मोठा भाऊ
६९) एकत्रित रडणे
७१) पराजय, माळ
७२) जिव्हा
७३) समईतील कापसाची गुंडाळी
७४) दुर्दशा
७५) अमृत
७७) आवाज, नाद, ध्वनी
७८) अस्वल
८०) दिवस, घाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# ओझरखेड ग्रामसभेचा सावळागोंधळ उघड

**नाशिक ।** जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्याच्या महाराष्ट्र गुजरात हद्दीलगतच्या आदिवासी बहुल भागातील ग्रामपंचायत ओझरखेड येथील कडेगहान, तूंगारपाडा, खडकीपाडा, कोशिंमपाडा, भुतारशेत, थोरातपाडा, रानविहीरपाडा आणि ओझरखेड या गावपाड्यांची संयुक्त ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी जमा, खर्च, शिल्लक रक्कमेचा हिशोब चक्क साध्या कागदावर लिहून ग्रामसभेत वाचन करण्यात आला.

ओझरखेड ग्रामपंचायतीची संयुक्त ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. भुतारशेत येथील महादू चौधरी यांची ग्रामसभा अध्यक्ष म्हणून ग्रामस्थांनी निवड केली. ग्रामपंचायत अधिकारी मोहीनी दळवी यांनी अध्यक्षांच्या परवानगीने ग्रामसभेला सुरुवात केली. यावेळी ग्रामसभा नोटीस वरील विषय एक ते नऊ चे वाचन करतेवेळी विषय क्र.२, मागील सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे. हा विषय वाचण्यात आला नाही. विषय क्र.५, विविध समित्या स्थापन करणे. या विषयाचे वाचन करताना एक तृतीयांश म्हणजे मयत व्यक्ती बदलण्यात येतील, सदर



समित्यांचे संपुर्ण सदस्य बदलण्यात येणार नाही असे ग्रामपंचायत अधिकारी यांनीच जाहीर केले. ग्रामस्थांना चर्चा करण्यास संधी मिळाली नाही. विषय क्र.६, वरीष्ठ कार्यालयाकडून आलेले परिपत्रकाचे प्रत्यक्ष वाचन केले नाही. परंतु जलजीवन मिशन पाईप लाईन ग्रामपंचायतीने ताब्यात घेण्यात यावी अशी ग्रामसभेला तोंडी माहिती दिली. यावर शासनाचे परिपत्रकाचे वाचन करावे,असे सुचवले असता कडेगहान पेसा ग्रामसभेत परिपत्रकाचे वाचन करण्यात आले आहे असे ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामसभेला माहिती दिली. तसेच विषय क्र.८, पंधरा वित्त आयोग जमा, खर्च वाचुन मंजुरी घेणे. याविषयी चर्चा करण्यात आली असता ग्रामपंचायतीचा नमुना पाच मधिल नोंदी जमा, खर्च, शिल्लक रकमेचा चक्क साध्या कागदावर लिहून हिशोब वाचन करण्यात आला,असे थोरातपाडा येथील प्रभाकर थोरात यांनी सांगितले. ग्रामपंचायत कारभाराबाबत ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

> कडेगहान गावाच्या पेसा ग्रामसभेत शासनाच्या वरीष्ठ कार्यालयाकडून आलेल्या परिपत्रकाचे वाचन करण्यात आले नसल्याने, शासनाकडून करण्यात आलेल्या सुचनांची ग्रामसभेत पुरेपूर माहिती मिळाली नाही.
>
> **- मंगेश पढेर, ग्रामस्थ कडेगहान**

> ग्रामसभेत विविध समित्यांची आणि मयत सदस्यांची माहिती देण्यात आली नाही. ग्रामपंचायतीच्या उप समित्या कोणत्या? सदर समितीचे अध्यक्ष, सदस्य व्याक्ती कोण? यामुळे ग्रामसभा अंधारात.
>
> **- गमन चौधरी, थोरातपाडा**

> आदिवासी भागात पेसा कायद्याने ग्रामसभेला दिलेला हक्क, अधिकार या माहितीचा अभाव असल्याने आपले हक्क, अधिकार वापरून ग्रामसभेत पारदर्शकता अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामस्थांच्या पुढाकाराचे प्रमाण कमी, यासाठी शासनाकडून ग्रामपंचायतींना वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. परंतु गाव स्तरावर पेसा कायदा व महिला सभा तसेच ग्रामसभा अधिकार या कायद्याची गावोगावी जनजागृती झालेली दिसून येत नाही.
>
> **- मनोज वाजे, सामाजिक कार्यकर्ता**

## दिंडीतील टॅक्टर उलटून एक ठार; अनेक जखमी

**नांदगाव ।** येवला तालुक्यातील उंदिरवाडी येथे स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला भाविकांच्या दिंडीतील ट्रॅक्टरची ट्रॉली पलटी झाल्याने देविदास दौलतराव सोनवणे (वय ५५) यांचा मृत्यू झाला तर पंढरीनाथ जाधव (वय ६५) यांच्या छातीला व डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. तर इतर तीन जणांवर उपचारा सुरु आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील उंदीरवाडी येथील भाविकांच्या दिंडीतील ट्रॅक्टरची ट्रॉली जातेगाव पासून सात ते आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या श्री पिनाकेश्वर महादेव डोंगरावरील परतीच्या प्रवास करताना डोंगर उतारावर पलटी झाल्याने ट्रॉली खाली दबून देविदास दौलतराव सोनवणे (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य चार जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी खाजगी व शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेने भाविकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. नांदगाव पोलिसांनी या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेत मदत कार्य सुरू केले.

# नाशिकच्या अनंत कान्हेरे मैदानावर स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा



**नाशिक ।** येथील अनंत कान्हेरे मैदानावर ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त भव्य ध्वजारोहण सोहळा आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या सोहळ्यात स्केटिंग चॅम्पियन पूजा तांबे, जॉगर्स क्लबचे अध्यक्ष दीपक भोसले आणि नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष अमित घुगे यांनी तिरंग्याला मानवंदना देऊन राष्ट्रीय ध्वज फडकावला. त्यानंतर राष्ट्रगान होऊन देशभक्तीचा जल्लोष साजरा झाला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे पूजा तांबे हिने नुकतीच दक्षिण कोरियामध्ये झालेल्या २०व्या एशियन रोलर स्केटिंग चॅम्पियनशिपमध्ये रोलर डरबी या खेळात भारताला सिल्वर मेडल मिळवून दिले आहे. तिच्या हस्ते झेंडावंदन



हा अभिमानाचा क्षण ठरला. कार्यक्रमात नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन, जॉगर्स क्लब, प्राण असोसिएशन आणि लायन्स क्लब यांचा सहभाग होता.

ध्वजारोहणानंतर सिव्हिल हॉस्पिटलतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्यात अनेक सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जॉगर्स क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा दीपक भोसले यांनी हाती घेतल्यापासून सातत्याने नवनवीन उपक्रम राबविले जातात रक्तदानाचा शुभारंभ त्यांनी स्वतःपासून सुरू केला. उपाध्यक्ष प्रवीण कोकाटे, संचालक नितीन कोटकर, दिपाली खैरनार यांनीही योगदान दिले. यावेळी जॉगर्स सभासदांचे स्वागत कृष्णा नागरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संजय शिंदे यांनी केले. दीपक काळे, भरत गुरव, हेमंत गोसावी, योगेश देशपांडे आदी सभासद उपस्थित होते.

## बीवायके महाविद्यालयात विद्यार्थिनी मंच, महिला सक्षमीकरण कक्षाचा उद्‍घाटन सोहळा

**नाशिक ।**येथील बी. वाय. के. वरीष्ठ महाविद्यालयात विद्यार्थिनी मंच व महिला सक्षमीकरण कक्षाचा उद्घाटन सोहळा नुकताच संपन्न झाला. उद्घाटन समारंभाच्या निमित्ताने बी. वाय. के. महाविद्यालयाने आपली नेहमीचीच नवनवीन उपक्रम हाती घेण्याची आणि समाजाप्रति असलेले आपले दायित्व दाखविण्याची परंपरा कायम राखत एका आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

'प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान' या योजनेंतर्गत बी. वाय. के. महाविद्यालयातील विद्यार्थिनी मंच व महिला सक्षमीकरण कक्ष यांनी निबंध स्पर्धा व रिल मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते, ज्याला विद्यार्थिनींचा भरघोर प्रतिसाद मिळाला. बी. वाय. के. हे नाशिक मधील पहिले महाविद्यालय आहे, जिथे 'क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम' आणि 'टीबी मुक्त कुंभमेळा' यासाठी आपला सहभाग नोंदविला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.



लीना भट यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि उपप्राचार्यांच्या उपस्थित कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. नाशिक महानगर पालिकेच्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय, (बिटको हॉस्पिटल) च्या वैद्यकीय अधिक्षक आणि शहर क्षयरोग अधिकारी डॉ. शिल्पा काळे यांनी या कार्यक्रमात विद्यार्थिनींना क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात युवकांचा कसा सहभाग अपेक्षित आहे, त्यांना या चळवळीत कसे सामील होता येईल याबद्दल अतिशय सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. युवा प्रतिनिधी डॉ. त्रंबकेश हे देखील कार्यक्रमाला उपस्थित होते. प्राध्यापकांनी निक्षय मित्र योजनेत सहभाग नोंदवला आणि क्षयरोग रुग्णांना अनुदान देण्याचे एक आदर्श सामाजिक पाऊल उचलले. महाविद्यालयाच्या डॉ.भट, उपप्राचार्या डॉ. सुषुम्ना काणे, डॉ. संगिता मोरे, डॉ. पल्लवी जोशी, डॉ. इंदिरा सिंग, डॉ. योगिनी दीक्षित, अनघा काण्णव यांनी ऊस्फूर्त प्रतिसाद देत निक्षय मित्र म्हणून टीबी रुग्णांसाठी पोषक आहार या योजनेत सहभागी झाले. ईनर व्हिल क्लब ऑफ नाशिक, अंबड, बी.वाय.के. महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. इनर व्हिल क्लबच्या अध्यक्ष अनिता सोनवणे, त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले.

## विठेवाडी येथील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी फडकवला कांदा चाळीजवळ तिरंगा

**देवळा ।** देवळा सह संपुर्ण कसमादे मध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने मिळवलेला कांदा चाळीत साठवून ठेवलेला होता, परंतु बदलत्या हवामानाचा फटका बसला, त्यामुळे ७० ते ७५ टक्के कांदा चाळीतच सडत चालला आहे, असं असताना शेतकऱ्यांनी ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने इतरत्र कोठेही न जाता, आपल्या घराजवळ असलेल्या शेतकरी संघटना व स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शेतातील चाळी समोर रांगोळी काढून, घरातील महिलांनी खराब होत असलेल्या कांदा बाजुला करुन चांगल्या कांद्याच्या सहाय्याने व्यंगचित्रकार किरण मोरे यांनी वंदे मातरम् हे नाव साकारले व सर्वांचं लक्ष वेधून घेतले.




संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा घोषणाबाजी करत जोरदार निषेध नोंदवला, चार पाच दिवसा पूर्वीच व्यंगचित्रकार किरण मोरे यांनी महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींचीना व्यंगचित्रातुन अवगत करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा संसदेच्या पटलावर मांडण्यास भाग पाडत सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. आज शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष माणिक निकम व स्वाभिमानी शेतकरी संघटनेने समन्वयक कुबेर जाधव, व्यंगचित्रकार किरण मोरे यांनी एकत्र येऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा राज्यकर्त्यांच्या निदर्शनास आणून देण्याच्या उद्देशाने अनोखे झेंडा वंदन साजरं केले. यावेळी पंचक्रोशीतील अनेक कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते, त्यामध्ये व्यंगचित्रकार किरण मोरे,वि. का सोसायटी चेअरमन कुबेर जाधव, माणिक निकम, तानाजी निकम, कैलास कोकरे, रमेश निकम, भास्कर निकम, मधुकर निकम, भालचंद्र निकम,केदा निकम, कैलास निकम, सुनील निकम माधा निकम, कृष्णा निकम, प्रदिप निकम आदी तरूण शेतकरी सामिल झाले होते.

# उपजतच अभिनय गुण लाभलेली बाल कलाकार : आराध्या कारके

काही व्यक्तींना परमेश्वर उपजतच कलागुण बहाल करीत असतो. त्यामुळे जीवनप्रवास करताना त्या व्यक्तीतील कलागुणांची अनाहूतपणे अनुभूती येते. त्या उपजत तथा सुप्त कलागुणांना सादरीकरणाची संधी लाभली, व्यासपीठ मिळाले तर संबंधित व्यक्ती गुणी कलाकार म्हणून उदयाला येऊ शकतो, येतो. आराध्या मुंजा कारके ही सात वर्षीय मुलगी अशीच अभिनयाचा उपजत कलागुण लाभलेली कलाकार म्हणून सध्या धूम करीत आहे. चला! जरा जाणून घेऊया तिच्याविषयी जरासं...




परभणी जिल्ह्यातील कुंभकर्ण टाकळी येथील रहिवासी असलेला कारके परिवार भाकरीचा चंद्र शोधण्यासाठी नाशिक नगरीत आला. आराध्याचे वडील मुंजा कारके हे येथील बांधकाम व्यावसायिक रवी अमृतकर यांच्याकडे शिपाई म्हणून काम करतात. आराध्या नवरचना इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये






शिकते. आराध्याला नृत्य, अभिनय करण्याची आवड आहे. शाळेतील विविध सांस्कृतिक कार्यक्रमातील ती हिरीने सहभाग घेते. तिच्यातील कलागुण ओळखून तिचे वडील मुंजा कारके यांनी आर्थिक परिस्थिती अतिबेताची असताना तिला अभिनेत्री अपूर्वा चौधरी यांच्याकडे अभिनयाचे धडे घेण्यासाठी पाठविले. उपजतच अभिनयाचा गुण असलेला आराध्यानेही अभिनयाची चुणूक प्रशिक्षणातून दाखविली. त्यातूनच चौधरी यांच्या प्रयत्नांनी आराध्याला कलर्स मराठीवर प्रदर्शित होणाऱ्या इंद्रायणी सिरीयलमध्ये भूमिका मिळाली आणि आराध्याचा रुपेरी पडद्यावरील अभिनयाचा प्रवास सुरू झाला.

आतापर्यंत आराध्याने इंद्रायणी





सिरीयलच्या 10 ते 12 भागांमध्ये काम केले असून, अजूनही ती काम करते आहे. याशिवायतीने आदित्य सातपुते निर्मित नवरी साँग यातही काम केले. अजूनही काही साँगमध्ये ती काम करीत आहे. यू ट्यूबवरील वरील एका शेतकरी उत्पादनाच्या जाहिरातीतही आराधने भूमिका केली आहे. दीपक मस्के यांच्या नव्याने येऊ घातलेल्या मराठी चित्रपटातही आराध्या छानश्या भूमिकेत झळकणार आहे. आराध्याचे वडील तिच्यासाठी खूप मेहनत घेतात. तिला चित्रीकरण्यासाठी घेऊन जाणे-आणणे, नवीन ऑडिशनसाठी घेऊन जाणे, तिला काय हवे नको ते पाहणे, तिच्याकडून संवाद पाठांतर करून घेणे यासह आवश्यक ते सर्व करतात. काम सांभाळून ते देता येईल तेवढा वेळ आराध्यासाठी देतात. त्यांचे कार्यालयीन सहकार्य मालकही त्यांना त्यासाठी सहकार्य देत असल्याचे मुंजा यांनी सांगितले. आराध्याने मी "माझ्या आईचेच ऐकणार" या एकांकिकेतही मुलीची भूमिका केली आहे. ती सुरेख नृत्यही करते. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेते. आराध्या कॅमेरासमोर अतिशय सहजपणे, निडरपणे वावरते . सुरुवातीला थोडी भीती वाटली. आता वाटत नाही, असे ती म्हणाली. चित्रीकरण असल्यावर शाळेला सुट्टी पडते. अभ्यास बुडतो; पण शाळेतील शिक्षकवृंद आणि सहकारी विद्यार्थी मित्रही सहकार्य करतात, असेही तिने सांगितले. अगदी कमी वयात आराध्याने रुपेरी पडदा गाजविला असून, साऱ्यांचे लक्ष वेधले आहे. तिची संवाद साधण्याची लकब, शब्दफेक, बोलतानाचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा असाच आहे. अभिनयाव्यतिरिक्त तिला चित्रकलेची आवड आहे. इंद्रायणीच्या सेटवर ती सहजपणे वावरते. सेटवर सर्वांची लाडकी आहे. तिला अभिनय क्षेत्रात खूप मोठे व्हायचे आहे. त्या दृष्टीने तिने वाटचाल सुरू केली असून, तिला तिच्या वडिलांचे खूप चांगले सहकार्य, पाठिंबा लाभला आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असताना, हातावर काम करणारा साधारण व्यक्ती असूनही त्यांनी मुलीतील उपजतच अभिनयाच्या कलागुणांना वाव दिला आहे.

## महत्त्वाचे

### कुलगुरू डॉ. कानिटकर आणि मनपा आयुक्तांची संयुक्त भेट

**नाशिक ।** नाशिकरोड येथील हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय येथे आज महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट



जनरल (नि.) डॉ. माधुरी कानिटकर व महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी संयुक्त भेट दिली. या भेटीचा उद्देश रुग्णालयात आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या माध्यमातून पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम सुरू करण्याची शक्यता तपासणे हा होता. याबाबत प्राथमिक पाहणी व चर्चा करण्यात आली. प्रस्ताव प्रत्यक्षात आल्यानंतर नाशिककरांना अधिक व्यापक व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे. भेटीदरम्यान रुग्णालयातील सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. नव्याने उभारण्यात येत असलेल्या नवजात शिशु अतिदक्षता विभाग तसेच अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर यांची पाहणी करण्यात आली. या सुविधा सुरू झाल्यानंतर बालरोग उपचार क्षमतेत आणि शस्त्रक्रिया सेवांमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. या प्रसंगी नाशिक महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विजय देवकर, डॉ. जितेंद्र धनेश्वर, डॉ. शिल्पा काळे, डॉ. प्रशांत शेटे यांच्यासह महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पदव्युत्तर कॉलेजचे डॉ. मृणाल पाटील, डॉ. गोपाल शिंदे, डॉ. सुहास पाटील व डॉ. कल्पना संकले उपस्थित होते. नाशिक मनपा आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार असून, तो नाशिक शहरातील आरोग्य, शिक्षण क्षेत्रासाठी नवे पर्व ठरणार आहे.

### कलाजाणिव गायन स्पर्धेत शिल्पा गोसावी; नृत्य स्पर्धेत तेजस्वीनी पगारे प्रथम

**नाशिक ।** कलाजाणिव गायन स्पर्धेत प्रथम



क्रमांक शिल्पा गोसावी यांनी तर छोट्यांसाठी झालेल्या नृत्यस्पर्धेत चिमुरड्या तेजस्वीनी पगारे हिने प्रथम क्रमांक पटकावला. दोन प्राथमिक फेऱ्यांनंतर अंतिम फेरी कुसुमाग्रज स्मारकातील विशाखा सभागृहात रंगली. प्रमुख पाहुणे सुनील कोचर व सुनील पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. अहिल्यानगर येथील जाणिव सांस्कृतिक अभियानतर्फे नाशिकमध्ये कलाविष्कार महोत्सव आयोजित करण्यात आला. नृत्य आणि गीत गायनाची अंतिम निवड फेरी काल झाली. कुसुमाग्रज स्मारकातील विशाखा सभागृहात झालेल्या या रंगारंग सोहळ्यात २४ गायक सहभागी झाले. संस्थापक, अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. संस्थेतर्फे राज्यभरात विविध उपक्रम राबविले जातात. नाशिक शहर, परिसरातील गायक कलाकारांनी व छोट्यांनी स्पर्धेत मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. एएन कराओके क्लबचे प्रमुख नितीनकुमार चव्हाण विशेष पाहूणे म्हणून उपस्थित होते. नृत्य स्पर्धेचे परीक्षण माया शिंदे व मुन्ना चव्हाण यांनी तर गायन स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध गायक, संगीतकार नंदकुमार देशपांडे आणि श्रीकांत गायकवाड केले. अंजली नितीनकुमार यांनी खास शैलीत सूत्रसंचालन केले. अंतिम स्पर्धा व पारितोषिक वितरण सोहळ्याला सर्व सहभागी कलाकार, रसिक उपस्थित होते. अटीतटीच्या झालेल्या गायन स्पर्धेत द्वितीय - सागर उगले, तृतीय - हर्षद पवार, उत्तेजनार्थ- डॉ.साक्षी पवार, चंद्रशेखर कोतकर, कमला डुलगज यांना सन्मानित करण्यात आले. नृत्यस्पर्धेत द्वितीय- दक्षा शेट्टी, तृतीय -मुग्धा पवार व उत्तेजनार्थ- राशी आव्हाड, पुष्पक कोल्हे, अनुष्का गायकवाड यांना पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले.

### पंचवटी कारंजा येथे मंगळवारी भव्य दहीहंडी उत्सव

**नाशिक ।** पंचवटी कारंजा येथे ऑफिस ग्रुप व माजी आमदार बाळासाहेब सानप यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा मंगळवार, दि. १९ ऑगस्ट रोजी सायं. ६.३० वा. पार पडणार असून विजेत्या गोविंदांसाठी १,११,१११/- चे बक्षीस ठेवण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून अभिनेत्री व नृत्यांगना मीरा जोशी, विजेती नृत्यांगना मिनाक्षी पोशे, निवेदिका शलाका भेंडे, गायक अमित पगारे व गायिका सोनल पडाया यांची उपस्थिती लाभणार आहे.नाशिककरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या दहीहंडीचा आनंद लुटावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दहीहंडी उत्सव पार पाडण्यासाठी ऑफिस ग्रुपचे सदस्य प्रयत्न करीत आहेत.

# बालांगण

## सैर धोकादायक विमानतळांची

छोट्यांनो, तुम्ही विमानप्रवास केला आहे का? विमान आकाशात भरारी घेत असताना आणि धावपट्टीवर उतरत असताना मनात थोडी धाकधूक असते. जगभरातल्या सुंदर, गजबजलेल्या विमानतळांबद्दल तुम्ही ऐकलं असेल. पण काही विमानतळ खूपच धोकादायक आहेत. इथे विमान उतरवताना पायलटचं कौशल्यं पणाला लागतं. चला तर मग, अशाच काही धोकादायक विमानतळांची माहिती घेऊ.

✔ कॅरेबियन बेटांवरच्या 'सबा आयलंड' येथील विमानतळाची धावपट्टी खूपच लहान आहे. फक्त १३०० फूट लांबीच्या धावपट्टीवर विमान उतरवावं लागतं. या धावपट्टीजवळच उतार आहे. या उताराच्या पुढे थेट समुद्र आहे. याच कारणामुळे हा विमानतळ खूप धोकादायक आहे.

✔ तिबेटमधला 'क्यामडो बामडा' विमानतळ जगातला सर्वात उंचीवरचा विमानतळ आहे. हा विमानतळ जवळपास १४ हजार फूट उंचीवर वसला आहे. या विमानतळावरच्या धावपट्टीची लांबी ३.५ मैल आहे. इथे विमान उतरवण्यासाठी पायलटला बरीच कसरत करावी लागते.

✔ अंटार्टिका खंड बर्फाने आच्छादलेला असतो. इथे 'आईस रन वे' आहे. या 'रन वे'वर नेहमी बर्फ पडलेला असतो. बर्फ पडलेल्या रन वेवर विमान उतरवणं किती कठीण असेल याची आपण कल्पनाच करू शकतो. इथल्या बर्फात विमानाचं चाक रुतू नये याची काळजी पायलटला घ्यावी लागते. अंटार्टिकावर बरंच संशोधन सुरू असतं. त्यासाठी संशोधकांना घेऊन येणारं विमान या 'आईस रन वे'वर उतरतं.

✔ नेपाळमधला 'तेंझिंग–हिलरी' विमानतळ असाच अनोखा आहे. जगातलं सर्वात उंच असं 'माउंट एव्हरेस्ट' शिखर सर करण्यासाठी बरेच गिर्यारोहक नेपाळमध्ये येतात. हे गिर्यारोहक याच विमानतळावर उतरतात. हा विमानतळ त्यांच्या स्वागतासाठी सज्ज असतो. या भागात जोरदार वारे वाहत असतात. तसंच भरपूर धुकंही असतं. यामुळे हा विमानतळ बराच धोकादायक ठरतो.

✔ जिब्राल्टरच्या विमानतळाबद्दल ऐकल्यावर तुम्हाला धक्काच बसेल. या विमानतळावर सतत वर्दळ असते. हा विमानतळ इथल्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागी आहे. विमानाचं उड्डाण होत असताना तसंच

**ॲडव्हेंचरस...**

विमान उतरत असताना रस्त्यावरची वाहतूक थांबवली जाते. असं असूनही आजवर इथे मोठा अपघात झालेला नाही. रस्त्याच्या मध्यभागी असणारा हा विमानतळ अनोखाच म्हटला पाहिजे.



## वाघोबा असतात असे

मित्रांनो, अलिकडेच आपण आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा केला. या दिवशी वाघांच्या संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण केली जाते. तुम्हीही वाघांशी संबंधित काही मनोरंजक गोष्टी ऐकल्या असतील. चला, आज त्यात आणखी भर घालू या.

तुम्हाला माहिती आहे का, प्रत्येक वाघाच्या अंगावरील पट्टे आपल्या बोटांच्या ठशांसारखे वेगळे असतात? होय... मुलांनो, कोणत्याही दोन वाघांच्या शरीरावर एकसारखेच पट्टे नसतात. म्हणूनच याच्या मदतीने वेगवेगळे वाघ ओळखले जातात. अंगावरील पट्टे केवळ वेगळी ओळखच निर्माण करत नाहीत तर जंगलात लपण्यासही त्यांना मदत करतात.




जगात सर्वाधिक वाघ भारतात आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मते, भारतात वाघांची संख्या सुमारे २,९६७ आहे. वाघांचे कान खूप संवेदनशील असतात. ते केवळ आवाज ऐकू शकत नाहीत तर एकमेकांशी संवादही साधू शकतात. वाघीण पिल्लांशी संवाद साधण्यासाठी कानामागील पांढऱ्या डागांचा वापर करते. ती कानांद्वारे धोक्याचा संकेत देखील देते. कोणत्याही प्रकारचा धोका जाणवल्यास वाघीण कान चपटे करून संकेत देते.

**वाचा तर खरं**

वाघ एका वेळी १८ ते २० किलो मांस खाऊ शकतात. एखादी मोठी शिकार मिळाली तर ते आठवडाभर पुन्हा शिकार करत नाहीत. हा त्यांच्या शरीराच्या नैसर्गिक अनुकूलन क्षमतेचा एक भाग आहे. वाघ पोटभर जेवला तर नंतर सुमारे ३० तास झोपतो. वाघ अनेक प्रकारचे आवाज काढतात. ते गुरगुरतात, फुसफुसतात आणि म्याऊसारखे आवाज देखील काढू शकतात. ते या आवाजांचा वापर संवाद साधण्यासाठी, मेटिंगसाठी आणि आपला प्रदेश चिन्हांकित करण्यासाठी करतात. पण असे हे देखणे वन्यजीव सध्या संकटात आहेत. दर आठवड्याला सरासरी दोन वाघांची तस्करांकडून सुटका केली जाते. वाघांच्या अवयवांची तस्करी हा आशियामध्ये एक मोठा काळा बाजार आहे. यामध्ये त्यांच्या शरीराचे अवयव पारंपरिक औषधांमध्ये वापरले जातात. बाजारात विकले जातात. त्यामुळेच पृथ्वीवर सुमारे २० लाख वर्षांपासून अस्तित्वात असणाऱ्या या प्रजातीचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. ती ओळखायला हवी

**ठिपके जुळवा**



## नौदलाविषयी थोडंसं...




मित्रमैत्रिणींनो, लष्कर, हवाई दलाप्रमाणेच नौदलही आपल्या संरक्षणासाठी सज्ज असतं. समुद्रमार्गे येणाऱ्या शत्रुला रोखण्याचं काम नौदलाकडे असतं. शत्रूदेशाची प्रमुख बंदरं तसंच नौदलाचे तळ उद्ध्वस्त करण्याची जबाबदारीही नौदलाकडे असते. आपलं भारतीय नौदलही खूप सक्षम आहे. १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झालं होतं. या युद्धात भारतीय नौदलाने खूप मोठी कामगिरी पार पाडली होती. भारताने या युद्धात विजय मिळवला होता. या विजयाची आठवण म्हणून चार डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय नौदल जगातलं सातव्या क्रमांकाचं सर्वात मोठं नौदल आहे.

आपल्या नौदलाची गणना जगातल्या दहा सक्षम नौदलांमध्ये होते. केरळमध्ये इंडियन नेव्हल अकादमी असून ही आशिया खंडातली पहिल्या क्रमांकाची नौदल अकादमी आहे.


**जनरल नॉलेज**

भारताच्या नौदलाचा इतिहास खूप जुना आहे. मारकॉस किंवा मरीन कमांडोज हे नौदलाचे अत्यंत कुशल अधिकारी समजले जातात. या कमांडोंना सर्वात आव्हानात्मक मोहिमांवर पाठवलं जातं. हे कमांडो वेशांतर करून सर्वसामान्य नागरिकांमध्ये मिसळतात आणि आपली मोहीम फत्ते करून येतात. 'शं नो वरुण:' हे आपल्या नौसेनेचं घोषवाक्य आहे. आपलं नौदल सुसज्ज आहे. नौदलाकडे अत्यंत शक्तिशाली युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुड्या आहेत. २५० पेक्षा अधिक लढाऊ विमानंही आहेत. नौदलात ६७ हजार अधिकारी कार्यरत आहेत.

**कृती रंगाता**



## कुत्रे वाहनामागे का धावतात?



छोट्या दोस्तांनो, रस्त्यावर शांत बसलेला कुत्रा अचानक एखाद्या चालत्या बाईक किंवा कारच्या मागे धावताना तुम्ही बघितले असेल. तो फक्त धावतच नाही तर जोरात भुंकतो. पण हे का घडते याचा कधी विचार केला आहे का? कुत्र्याची वास घेण्याची क्षमता माणसांपेक्षा खूप शक्तिशाली असते. ते दुरूनही वास घेऊ शकतात. वाहन दुसऱ्या ठिकाणाहून येते तेव्हा तिथे असणाऱ्या कुत्र्यांचा वास टायरला चिकटतो. वाहन नवीन परिसरात पोहोचताच स्थानिक कुत्रे टायरवरील

**माहिती असावे**

वेगळ्या जागेचा वास बरोबर ओळखतात. त्यांच्यासाठी हा बाहेरील कुत्र्याने त्यांच्या परिसरात प्रवेश केल्याचा इशारा असतो. म्हणूनच ते लगेच सावध होतात आणि वाहनाचा पाठलाग करू लागतात. असे करुन जणू ते आपल्या सीमेचे रक्षण करत असतात. कुत्रे सहसा वाहनांच्या टायरवर लघवी करतात. हा योगायोग नाही तर हीदेखील त्यांची विशेष भाषा असते. इथे कोणी येऊ नये, हे सांगण्याचा त्यांचा हा प्रयन असतो. कुत्रे अत्यंत संवेदनशील असतात. एखाद्या वाहनाने त्यांच्या साथीदाराला दुखापत केली असेल किंवा त्याला अपघातात मारले असेल तर ते अशा वाहनाला ओळखू शकतात. पुढच्या वेळी ते वाहन दिसते तेव्हा ते कदाचित बदला घेण्यासाठी किंवा रागाच्या भरातही त्या वाहनाचा पाठलाग करतात. कुत्रे सहसा स्थिर वस्तूंकडे दुर्लक्ष करतात, परंतु वेगाने चालणारी किंवा धावणारी कोणतीही गोष्ट त्यांच्यासाठी आव्हान वाटते. शिकारी स्वभावामुळे ते वेगाने चालणाऱ्या वस्तूंचा पाठलाग करू लागतात. म्हणूनच ते चालणाऱ्या माणसांना त्रास देत नाहीत पण दुचाकी किंवा कारचा आवाज आणि वेग त्यामुळे सावध होऊन स्वत:च्या रक्षणाला सिद्ध होतात.

## 'एचएस कोड' म्हणजे काय?

दोस्तांनो, खादी या कापडाबद्दल तुम्ही ऐकलं असेल. खादीचे कुर्ते, साड्या, ड्रेस, शर्ट मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. खादी म्हणजे भारताची शान. केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने या खादीला 'एचएस कोड' दिला आहे. एचएस कोड म्हणजे नेमकं काय? जाणून घेऊ.

एचएस कोड म्हणजे 'हॉर्मोनाइज्ड सिस्टीम कोड'. हा आंतरराष्ट्रीय कोड आहे. खादीची मागणी, विक्री, खरेदी, निर्मिती आणि प्रसिद्धी वाढवण्यासाठी तसंच जगभरात नवी ओळख निर्माण करण्यासाठी सरकारने हा कोड दिला आहे. एचएस कोड म्हणजे सहा आकडी क्रमांक. 'वर्ल्ड कस्टम ऑर्गनायजेशन' म्हणजे डब्ल्यूसीओकडून अशा प्रकारच्या कोडची निर्मिती केली जाते.

**जाणून घ्या**

उत्पादनाला परदेशात किती मागणी आहे, उत्पादनाचा किती वापर होतो हे एचएस कोडमुळे कळू शकतं. आज २०० पेक्षा जास्त देश आंतरराष्ट्रीय व्यापारसाठी तसंच जास्तीत जास्त माहिती मिळवण्यासाठी या डाटाचा वापर करतात. सरकारी आणि खाजगी कंपन्या तसंच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांकडून एचएस कोडचा वापर केला जातो.



## नृत्याची आवड असेल तर...

मुलांनो, तुम्हाला नाचायला आवडतं का? तुमच्या नाचाचं कौतुक होतं का? तुम्ही डान्स क्लासला जाता का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं 'हो' असतील तर तुम्ही नृत्यातही करिअर करू शकता. कथक, भरतनाट्यम, कुचिपुडी, ओडिसी हे शास्त्रीय नृत्याचे प्रकार आहेत. ही नृत्यं शिकण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागते. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर तुम्ही शास्त्रीय नृत्यात निपुण होता. यासोबतच पाश्चात्य नृत्य, चित्रपटांवरच्या गाण्यांवरचं नृत्य, झुंबा डान्स असे प्रकारही प्रचलित आहेत. यासोबतच विविध प्रांतांची लोकनृत्यही आहेत.

नृत्यकलेचा समावेश परफॉर्मिंग आर्टसमध्ये होतो. नृत्यकलेत प्राविण्य मिळवण्यासाठी तुम्हाला संगीताची आवड असायला हवी. ताल, सूर, ठेका यांची जाण असायला हवी. नृत्याप्रती झपाटलेपण हवं. नृत्यावर आधारित रिॲलिटी शोजमुळे आज अनेकांना व्यासपीठ मिळू लागलं आहे. नृत्यकलेच्या आवडीच्या बळावर या क्षेत्रात करिअर करता येईल. मात्र प्रशिक्षण तसंच पदवीमुळे तुम्हाला बऱ्याच

**कोण होणार?**

संधी खुल्या होतील. विविध संस्था नृत्याचं प्रशिक्षण देतात. नृत्याचं प्रशिक्षण घेऊन तुम्ही पुढे जाऊ शकता. विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकता. पुरेशा अनुभवानंतर स्वत:ची प्रशिक्षण संस्थाही काढू शकता.



## चित्ता नव्हे, रोबो...

जगभरातच विविध प्रकारचे रोबो बनवले जात आहेत. अमेरिकेतल्या एका संशोधन संस्थेने चार पायांचा रोबो तयार केला आहे. या अनोख्या रोबोविषयी...

अमेरिकेतल्या कॅंब्रिजमधल्या मॅसॅच्युसेट्स इस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने चार पायांचा रोबो तयार केला आहे. हा रोबो चित्त्यासारखा दिसतो. याच कारणामुळे त्याला मिनी चित्ता रोबो हेच नाव देण्यात आलं आहे. मिनी चित्ता रोबो रिमोटवर चालतो. हा रोबो एका सेकंदात ३० ॲक्टिव्हिटी करू शकतो. गंमत म्हणजे तो फुटबॉलही खेळतो.

**टेक फन**

तोल गेल्यावरही हा रोबो स्वत:ला सावरू शकतो. तो लगेच धावण्याच्या स्थितीत येतो. चित्ता, वाघ, मांजरासारखे प्राणी दबक्या पावलांनी येतात. चित्ता रोबोही अशाच प्रकारे दबक्या पावलांनी चालू शकतो. या रोबोला जगातल्या चित्ता या सर्वात वेगवान प्राण्याचा वेग गाठता आलेला नाही. चित्ता १२० किलोमीटर प्रति तास एवढ्या वेगाने धावू शकतो. पण चित्ता रोबोची गती फक्त १४ किलोमीटर प्रति तास एवढीच आहे.

मॅसाच्युसेट्स इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतले प्राध्यापक सेंगबाई किम यांच्या पुढाकाराने हा मिनी चित्ता रोबो तयार करण्यात आला आहे. किम यांना चित्ता हा प्राणी खूप आवडतो. त्यांनी यू ट्यूबवर चित्त्याचे बरेच व्हिडिओ बघितले. यामुळे त्यांना या रोबोची कल्पना सुचली.



## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) केरळची राजधानी कोणती?
२) आयपॉड तयार करणारी कंपनी कोणती?
३) चव, गंध आणि रंग नसलेला वायू कोणता?
४) इंग्लंडची राजधानी कोणती?
५) हृदय आणि फुफ्फुसाचं संरक्षण करणाऱ्या हाडांना काय म्हणतात?
६) परदेशात जाण्यासाठी कोणत्या कागदपत्राची आवश्यकता असते?
७) कोणत्या कापडाला कृत्रिम रेशीम असं म्हटलं जातं?
८) नेल पॉलिश रिमूव्हरमध्ये काय असतं?
९) ब्लिचिंग पावडरमध्ये कोणता घटक असतो?
१०) धुण्याच्या सोड्याचं शास्त्रीय नाव काय?

उत्तर : १) थिरूअनंतपुरम २) ॲपल ३) ऑक्सिजन ४) लंडन ५) बरगड्या ६) पासपोर्ट ७) रेयॉन ८) ॲसिटोन ९) क्लोरीन १०) सोडियम कार्बोनेट

**दोस्त हे मस्त**

### असे हे पक्षी



दोस्तांनो, पक्ष्यांचं जगही अनोखं असतं. आता घुबडाचंच बघा. मागे बघण्यासाठी घुबडाला अंग हलवावं लागत नाही. फक्त मान वळवून तो मागे बघू शकतो. हमिंगबर्ड मागच्या दिशेनेही उडू शकतो. गिधाड सर्वात उंच उडणारा पक्षी आहे. हा पक्षी जवळपास ११,२०० मीटर उंचीवरून उडू शकतो. वूड डकचे पंख रंगीत असतात. नर वूड डकच्या अंगावर पांढरे ठिपके असतात. तसंच त्यांचे डोळे लाल असतात. मादी वूड डकचे डोळे पांढरे आणि शरीर करड्या रंगाचं असतं.

**खादाडी**

### मस्त मोजरेला टोस्ट

मुलांनो, संध्याकाळी मोजरेला टोस्ट बनवून खाता येईल. यासाठी एक क्रस्ट ब्रेड, तीन चमचे बटर, एक चमचा ठेचलेला लसूण, अर्धा चमचा मिरपूड, कांद्याची चिरलेली पात, मोजरेला चीज आणि मीठ हे साहित्य घ्या. ब्रेडचे एक इंच आकाराचे तुकडे करून घ्या. यानंतर ब्रेडची एक बाजू भाजून घ्या. न भाजलेल्या भागवर बटर लावा आणि त्यावर मोजरेला चीज क्यूब किंवा स्लाईस ठेवा. त्यावर मिरपूड, मीठ आणि थोडी कांद्याची पात घाला. आता चीज वितळेपर्यंत मायक्रोवेव्हमध्ये ब्रेड बेक करून घ्या. सॉससोबत गरमागरम खा.



**स्टडी टिप्स**

### उगाच पाठांतर करू नका

छोट्यांनो, तुम्ही एकाच विषयाचं सतत पाठांतर करता का, महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करता का, यामुळे अभ्यास चांगला होतो, बऱ्याच गोष्टी आपल्या लक्षात राहतात असं तुम्हाला वाटतं का? प्रत्यक्षात अभ्यासाची ही पद्धत चुकीची आहे. अशा पद्धतीने अभ्यास करून काहीच साध्य होत नाही. उलट वेळ वाया जातो. अभ्यास नीट लक्षातही रहात नाही. त्यामुळे सतत एकाच विषयाचा अभ्यास करत बसू नका. विविध विषयांना वेळ वाटून द्या.



**योगा टाईम**

### दृष्टी सुधारा

मुलांनो, मोबाईल आणि कॉम्प्युटरमुळे कमी वयात चष्मा लागतो. लहानग्या मुलांनाही आता चष्मा लागू लागला आहे. दृष्टी सुधारण्यासाठी तुम्ही योगासनं करू शकता. सर्वात आधी मांडी घालून बसा. हळूहळू श्वास घेत रहा. डोळे वर, खाली, डावीकडे आणि उजवीकडे फिरवा. मान सरळ ठेवा. मग मानही सगळ्या बाजूंनी फिरवा. या आसनामुळे डोळ्यांना आराम मिळेल.



# पुतीन-ट्रम्प भेटीनंतर काही तासातच रशियाचा युक्रेनवर मोठा हवाई हल्ला

मॉस्को, दि. १७ वृत्तसंस्था

रशियाने पुन्हा एकदा यूक्रेनवर मोठा हवाई हल्ला चढवत, 85 'शाहेद' प्रकारचे ड्रोन आणि एक इस्कंदर-M बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागले. हा हल्ला रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अलास्का येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर केवळ काही तासांतच करण्यात आला.



यूक्रेनच्या हवाई दलाच्या माहितीनुसार, हा हल्ला १५ ऑगस्टच्या संध्याकाळपासून १६ ऑगस्टच्या पहाटेपर्यंत सुरू होता. युक्रेनमधील अनेक भाग, विशेषतः सीमेवरच्या संघर्षप्रवण भागांना लक्ष्य करण्यात आले.

यूक्रेनने सांगितले की त्यांच्या हवाई संरक्षण यंत्रणेने ८५ पैकी ६१ ड्रोन पाडण्यात यश मिळवले. मात्र काही ड्रोन टाळता आले नाहीत आणि त्यांनी विविध भागांमध्ये नुकसान केले. या हवाई हल्ल्याबरोबरच रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने डोनेत्स्कमधील कोलोदियाझी गाव आणि डनिप्रोपेत्रोव्स्क भागातील वोरोने गावाचा ताबा घेतल्याचा दावा केला आहे. मात्र, युक्रेनशी संबंधित निरीक्षण संस्थांनी सांगितले की रशियन सैन्य अजूनही वोरोने गावाच्या काही अंतरावर आहे. हा हल्ला अशा वेळी झाला जेव्हा अलास्कामध्ये पुतिन आणि ट्रम्प यांच्यात युध्द थांबवण्यासाठीची बैठक झाली होती. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी शांततेकडे वाटचाल करण्याची इच्छा व्यक्त केली, मात्र कोणताही ठोस तह किंवा युद्धविराम झाला नाही. गुप्त बैठकीच्या तपशीलांची माहिती एका हॉटेलच्या प्रिंटरवर सापडल्याने राजनैतिक वर्तुळात खळबळ उडाली होती, ज्यामध्ये मेनू, भेटवस्तूंची माहिती आणि जागांची यादी होती.

फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धाला आता तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. या काळात हजारो लोकांचा मृत्यू झाला असून, लाखो नागरिकांना स्थलांतर करावे लागले आहे. रशियाचे अजूनही पूर्व आणि दक्षिण युक्रेनमधील मोठ्या भूभागांवर नियंत्रण आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा ढगफुटी! सात जणांचा मृत्यू

कठुआ. दि. १७ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात काही दिवसांपूर्वीच ढगफुटीची घटना घडली होती, ज्यामध्ये सुमारे ६५ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आथा पुन्हा एकदा कठुआ जिल्ह्यातील एका दुर्गम गावात शनिवार आणि रविवारच्या रात्री ढगफुटीची घटना घडली आहे. या दुर्घटनेत किमान ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी पीटीआयशी बोलताना दिली.

राजबागच्या जोड घाटी गावात ढगफुटीची घटना घडली. यामुळे गावाचा संपर्क तुटला असून काही मलमत्ता आणि जमिनीचे नुकसान झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितलले. पोली आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांची संयुक्त पथके घटनास्थळी दाखल झाली असून स्थानिकांच्या मदतीने रविवारी सकाळी बचावकार्य सुरू होते.

आत्तापर्यंत चार नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर सहा जखमी लोकांना बाहेर काढून त्यांना रुग्णलयात दाखल केले जात आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी पीटीआयशी बोलताना दिली.

जिल्ह्यात झालेली ढगफुटी आणि भुस्खलन यानंतर जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी प्रशासनाला बचाव आणि मदतकार्य करण्याचे आणि नागरिकांची सुरक्षितता निश्चित करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच त्यांनी पीडित कुटुंबांबद्दल संवेदना व्यक्त केल्या आहेत आणि जखमी नागरिक लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना केली आहे. मुख्यमंत्र्यांनी



कठुआ जिल्ह्यात तसेच जोध खेड आणि जुथना येथे भूस्खलनामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल आणि नुकसानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मुख्यमंत्र्यांनी शोकाकुल कुटुंबीयांबद्दल संवेदना व्यक्त केल्या असून, जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली आहे. तसेच, बाधित कुटुंबांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. याबरोबरच, मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला बाधित कुटुंबासाठी तात्काळ मदत, बचाव आणि स्थलांतरण उपाय राबवण्याचे आणि त्यांना सुरक्षितता आणि पाठिंबा देण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती जमू काश्मीरच्या मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी कठुआ येथील परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी एक्सवर पोस्ट करत आपण कठुआचे एसएसपी शोभित सक्सेना यांच्याशी चर्चा केल्याचे सांगितले. तसेच त्यांनी मृतांच्या कुटुंबियांबद्दल शोक व्यक्त केला.

त्यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, जंगलोट परिसरात ढगफुटीची माहिती मिळाल्यानंतर कठुआचे एसएसपी शोभित सक्सेना यांच्याशी बोललो. या दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला आहे. याबरोबरच रेल्वे ट्रॅक, राष्ट्रीय महामार्ग, कठुआ पोलिस स्टेशनचे नुकसान झाले आहे. नागरी प्रशासन, लष्कर आणि निमलष्करी दलाने मदतकार्य सुरू केले आडे. परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे. मृतांच्या कुटुंबियांबद्दल मी संवेदना व्यक्त करतो.

# आरएसएस म्हणजे भारतीय तालिबान- बी. के. हरिप्रसाद

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

स्वतंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कौतुक केले होते. यानंतर काँग्रेसच्या एका वरिष्ठ नेत्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा 'भारतीय तालिबान' असल्याचे म्हटले आहे. एका वृत्तसंस्थेशी बोलताना माजी राज्यसभा खासदार बी. के. हरिप्रसाद यांनी आरएसएसचे कौतुक केल्याबद्दल पंतप्रधान मोदींवर टीका करताना यासंबंधी विधान केले आहे.

"ते (आरएसएस) देशातील शांतता बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. मी आरएसएसची तुलना फक्त तालिबानशी करेन. ते भारतीय तालिबान आहेत आणि पंतप्रधान त्यांचे लाल किल्ल्यावरून कौतुक करत आहेत," असे ते एएनआयशी बोलताना म्हणाले.


हरिप्रसाद यांनी आरएसएसच्या आर्थिक स्थितीवर देखील यावेळी प्रश्न उपस्थित केले. "स्वतंत्र्यलढ्यात सहभागी झाले असे कोणी 'संघी' होते का? आरएसएस ही नोंदणीकृत संघटना नाही ही शरमेची बाब आहे. त्यांना निधी कुठून मिळतो याबद्दल आम्हाला माहिती नाही. कोणत्याही एनजीओला देशात काम करतायेच असेल तर त्यांनी संविधानाप्रमाणे नोंदणी केली पाहिजे," असेही ते म्हणाले.

# भाजपा नेत्याने गर्लफ्रेंडच्या सांगण्यावरून केली पत्नीची हत्या, दोघांनाही झाली अटक

अजमेर, दि. १७ वृत्तसंस्था

राजस्थानच्या अजमेर जिल्ह्यातील किशनगड येथील भाजपा नेता रोहित सैनीने त्याची प्रेयसी रितू सैनीच्या सांगण्यावरून पत्नी संजू सैनीची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. १० ऑगस्ट रोजी सदर गुन्हा घडला होता. मात्र हत्या केल्यानंतर दरोड्याचा बनाव केल्यामुळे पोलिसांची दिशाभूल करण्यात आली होती. मात्र पोलिसांनी कसून तपास करत आता रोहित सैनी आणि प्रेयसी रितूला अटक केली आहे.

अतिरिक्त पोलीस अधीक्षक दीपक कुमार यांनी माहिती



दिल्यानुसार आता दोन्ही आरोपींची अटक करण्यात आली आहे. सुरूवातीला पोलिसांची दिशाभूल केल्यानंतर पुढील २४ तासांत पोलिसांनी या प्रकरणाचा उलगडा केला.

१० ऑगस्ट रोजी संजू संशयास्पद परिस्थितीत मृतावस्थेत आढळी होती. सुरुवातीला पती रोहित सैनीने दावा केला की, अज्ञात दरोडेखोरांनी त्याच्या पत्नीची हत्या केली आणि घरातील मौल्यवान वस्तू घेऊन पळाले. तथापि, पोलिसांनी तपास केला असता रोहित सैनीच्या जबाबात त्यांना विसंगती आढळली. सखोल चौकशी केल्यानंतर रोहितने हत्येची कबुली दिली आणि मग त्याने रचलेला कट उघड झाला.

पोलिसांच्या तपासानुसार, रोहितने कबूल केले की, त्याने प्रेयसीच्या सांगण्यावरून पत्नीची हत्या केली. तपासात पुढे असे दिसून आले की, रोहित आणि रितू अनेक वर्षांपासून संबंधात होते. त्याची पत्नी या संबंधात अडथळा ठरत होती. रितूने पत्नी संजूला बाजूला करण्यासाठी रोहितवर दबाव टाकला होता. यासाठी रोहितने पत्नीची निर्घृण हत्या केली. तसेच दरोड्याची बतावणी करून पोलिसांची दिशाभूल केली.

पोलिसांनी रोहित सैनी आणि रितू सैनी या दोघांना अटक केली असून त्यांची आणखी चौकशी सुरू आहे.

## 'न्यायालय सर्वोच्च नाही', केंद्र सरकारचा सर्वोच्च न्यायालयाला इशारा

# राष्ट्रपती-राज्यपालांना दिलेल्या मुदतीवर घेतला आक्षेप

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

राज्य विधिमंडळाने सादर केलेल्या विधेयकांवर कारवाई करण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपालांना तीन महिन्यांची मुदत देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला केंद्र सरकारने विरोध केला आहे. केंद्र सरकारचे महाधिवक्ता तुषार मेहता यांनी म्हटले की, लोकशाहीत न्यायालयांकडे सर्व प्रश्नांची उत्तरे नाहीत. "जर लोकशाहीतील एखाद्या घटकाला (राज्य) दुसऱ्या घटकावर शिरजोरी करण्याची संधी दिली तर त्याचे रुपांतर संवैधानिक अव्यवस्थेत होतील", असे तुषार मेहता म्हणाले.

केंद्र सरकारने आपले म्हणणे तुषार मेहता यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयाकडे लिखित स्वरुपात दिले आहे.

१२ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर राष्ट्रपती आणि राज्यपालांना राज्यांच्या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यासाठी वेळापत्रक निश्चित करता येईल का? यावर सुनावणी सुरू असताना मेहता यांनी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका यांच्यातील अधिकारांच्या विभाजनाचे महत्त्व अधोरेखित केले होते.

तुषार मेहता यांनी सांगितले की, अधिकारांचे पृथक्करण हा संवैधानिक चौकटीचा भाग असला तरी काही वर्षांपासून, व्यावहारिक वापरात काही प्रमाणात एकमेकांवर



अतिव्याप्ती होणे आणि नियंत्रण येणे किंवा अधिकारांचे मिश्रण तयार झाले आहे.

"काही क्षेत्रे अशी आहेत, जी तीन अवयवांपैकी कोणत्याही एका घटकासाठीच मर्यादीत राहतात. इतरांना त्यावर ताबा मिळवता येत नाही. राज्यपाल आणि राष्ट्रपती सारखे उच्च पदे त्यातच मोडतात. जरी ती राजकीय पदे असली तरी ती लोकशाहीच्या इच्छाशक्तीचे प्रतिनिधित्वही करतात", असेही महाधिवक्ता तुषार मेहता म्हणाले.

मेहता पुढे म्हणाले, "राष्ट्रपती पदासाठी निवडणूक होते आणि राज्यपालांची नियुक्ती मंत्रिमंडळ (राष्ट्रपतींमार्फत कार्य करणारे) करते. लोकशाहीमध्ये थेट निवडणुका हा लोकशाही प्रक्रियेचा एकमेव प्रकार नाही. तर निवडून आलेले प्रतिनिधींद्वारे केल्या जाणाऱ्या नियुक्त्याही लोकाशाहीवरच्या आस्थेचे कायदेशीर केंद्र आहे."

राज्यापालांबद्दल बोलताना मेहता म्हणाले की, संघराज्याच्या चौकटीमध्ये राज्यपालांना परके मानले जाऊ शकत नाही. राज्यपाल हे केवळ केंद्राचे दूत नसून ते संघराज्यीय व्यवस्थेतील संपूर्ण राष्ट्राचे प्रतिनिधी असतात.

सर्वोच्च न्यायालयाने एप्रिलच्या सुनावणीमध्ये विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकांना एका विशिष्ट कालमर्यादेत मंजुरी द्यावी वा ती नामंजूर करावीत, असे निर्देश दिले. त्यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा निश्चित केली. संविधानाच्या अनुच्छेद २०१ नुसार राज्यपाल वा राष्ट्रपतींवर अशी कोणतीही कालमर्यादा घालण्याची तरतूद नाही, असे आता केंद्र सरकारने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल महिन्यात ऐतिहासिक निकाल दिला होता. तमिळनाडूचे राज्यपाल आरएन रवी यांनी तमिळनाडू राज्य सरकारने मंजूर केलेली १० विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ अडवून ठेवली होती. राज्यपालांची ही कृती बेकायदेशीर आणि कायद्याचे चुकीचे उदाहरण असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. तसेच राष्ट्रपतींनी या विधेयकांवर केलेली कोणतीही कारवाईही दखलपात्र नाही, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तसेच राज्यपालांकडे दुसऱ्यांदा विधेयके सादर केल्याच्या तारखेपासून सदर विधेयके मंजूर झाल्याचे मानले जाईल, असेही सर्वोच्च न्यायालयाने होते.

सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या अनुच्छेद १४२ नुसार आपले अधिकार वापरून तमिळनाडू सरकारची दहा विधेयक मंजूर केली होती.


# आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीसाठी बाणगंगा पेपर इंडस्ट्रीजचे रु. २१.१७ कोटी उत्पन्न जाहीर

BANGANGA PAPER INDUSTRIES LIMITED

क्राफ्ट पेपर्सच्या विस्तृत श्रेणीतील आघाडीच्या उत्पादक आणि पुरवठादारांपैकी एक असलेल्या बाणगंगा पेपर इंडस्ट्रीज लिमिटेड (बीएसई: ५१२०२५) ने आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीसाठी त्यांचे अलेखित निकाल जाहीर केले आहेत. आर्थिक वर्ष २६ च्या पहिल्या तिमाहीसाठी एकूण उत्पन्न (एकत्रित) रु.२१.१७ कोटी होते तर EBITDA रु.१.५७ कोटी नोंदवले गेले. EBITDA मार्जिन ७.४२% होता तर निव्वळ नफा रु.०.६५ कोटी होता आणि निव्वळ नफा मार्जिन ३.०८% होता. प्रति शेअर कमाई रु.०.०५ होती.

आर्थिक कामगिरीबद्दल भाष्य करताना, कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. कारभारी धात्रक म्हणाले, "पहिल्या तिमाहीत रु.२१.१७ कोटींच्या एकूण उत्पन्नासह आर्थिक वर्ष २०२६ मध्ये चांगली सुरुवात केल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे. ही कामगिरी बाजारातील परिस्थिती, कार्यक्षमतेतील आमची ताकद आणि शाश्वत विकासासाठीची आमची वचनबद्धता दर्शवते. कचऱ्यापासून मिळवलेल्या इंधनाचा वापर, शून्य द्रवपदार्थ सोडणे आणि कचऱ्यापासून संसाधन पुनर्प्राप्ती यासारख्या पर्यावरणपूरक पद्धतींमध्ये आमची सतत गुंतवणूक केवळ आमची खर्च स्पर्धात्मकता मजबूत करत नाही तर दीर्घकालीन पर्यावरण संरक्षणासाठी आमची वचनबद्धता देखील मजबूत करते.या उपक्रमांसह आणि आमच्या समर्पित टीमच्या प्रयत्नांसह, आम्ही आमच्या ग्राहकांना, भागधारकांना आणि आम्ही सेवा देत असलेल्या समुदायांना सतत मूल्य प्रदान करण्यासाठी चांगल्या स्थितीत आहोत.''

लोकार्थ

# विक्रम सोलरचा आयपीओ मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५ रोजी उघडणार

विक्रम सोलर लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १०/- दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी रु.३१५/- ते रु.३३२/- असा किंमत पट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ४५ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ४५ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ १,५०० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन शेअर्सच्या विक्री आणि १,७४,५०,८८२ पर्यंतच्या विक्रीच्या ऑफरचे मिश्रण आहे. प्रमोटर आणि प्रमोटर ग्रुप विक्री शेअरहोल्डर्स. या ऑफरमध्ये पात्र कर्मचाऱ्यांकडून कर्मचारी आरक्षणाच्या भागात सबस्क्रिप्शन



आरक्षण देखील समाविष्ट आहे. नवीन इश्यूमधून मिळणारे उत्पन्न ७६९.७३ कोटी रुपयांपर्यंत आहे, जे त्यांच्या पूर्ण मालकीच्या उपकंपनी, व्हीएसएल ग्रीन पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, या फेज-१ प्रकल्पासाठी गुंतवणुकीद्वारे भांडवली खर्चाच्या अंशतः निधीसाठी आहे; ५९५.२१ कोटी रुपये त्यांच्या पूर्ण मालकीच्या उपकंपनी, व्हीएसएल ग्रीन पॉवर प्रायव्हेट लिमिटेड, या फेज-२ प्रकल्पासाठी गुंतवणुकीद्वारे भांडवली खर्चाच्या निधीसाठी आहेत; आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी आहेत.

# शालिमार एजन्सीजचे नाव आता स्पाइस लाउंज फूड वर्क्स

स्पाइस लाउंज फूड वर्क्स लिमिटेड (BSE: 539895), ज्याला पूर्वी शालिमार एजन्सीज लिमिटेड म्हणून ओळखले जात असे, त्यांनी अधिकृतपणे त्यांचे नाव बदलले आहे जे 11 ऑगस्ट 2025 पासून प्रभावी होईल. कंपनीच्या मंडळाची बैठक 14 ऑगस्ट 2025 रोजी होणार आहे आणि 30 जून 2025 रोजी संपलेल्या तिमाहीच्या अलेखापरिक्षित आर्थिक निकालांचा विचार करून त्यांना मान्यता देण्यात येईल.स्पाइस लाउंज फूड वर्क्स लिमिटेड (BSE: 539895) ने 11 ऑगस्ट 2025 रोजी औपचारिकपणे त्यांचे नवीन नाव स्वीकारले.

Spice Lounge Food Works Ltd

२०१९ मध्ये भारतात स्थापन झालेली स्पाइस लाउंज फूड वर्क्स (SLFW) ही एक वेगाने वाढणारी अन्न आणि तंत्रज्ञान कंपनी आहे जी भारत, अमेरिका आणि कॅनडामध्ये कार्यरत आहे. कंपनीकडे बफेलो वाइल्ड विंग्ज, विंगझोन, ईटच आणि टेकसॉफ्ट सारख्या जागतिक ब्रँडसाठी विशेष फ्रँचायझी अधिकार आहेत आणि ब्लेझ कबाब, झोरा, सलुद आणि सनबर्न युनियन सारख्या तिच्या चार मूळ ब्रँडची मालकी आहे. नावीन्यपूर्णता आणि गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करून, SLFW वेगाने जागतिक स्तरावर आपला प्रभाव वाढवत आहे.स्पाइस लाउंज फ्रँचायझी नवीन समुदायांमध्ये त्यांच्या सिग्नेचर ब्रँड्सचे स्वादिष्ट स्वाद आणि उबदार आदरातिथ्य आणते.स्पाइस लाउंजमध्ये, कंपनी क्लासिक ब्रँड्सना पुनरुज्जीवित करते आणि धोरणात्मक नियोजन आणि तंत्रज्ञान-नेतृत्वाखालील स्केलेबल मॉडेल्सद्वारे त्यांना वेगाने वाढवते.

# मंगल इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीजचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव २०ऑगस्ट रोजी उघडणार

मंगल इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्याच्या इक्विटी शेअरसाठी ५३३ रु. ते ५६१ रु. असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (आयपीओ" किंवा इश्यू) बुधवार, २० ऑगस्ट, २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि शुक्रवार, २२ ऑगस्ट, २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २६ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर २६ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ पूर्णपणे ४०० कोटी रुपयांपर्यंतच्या शेअर्सचा नवीन इश्यू आहे.

MANGAL

नवीन इश्यूमधून मिळणाऱ्या निधीपैकी काही निधी कंपनीने घेतलेल्या काही थकित कर्जांच्या पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्वपेमेंटसाठी १०१.२७ कोटी रुपयांपर्यंत; राजस्थानच्या रीनगस सीकर जिल्ह्यात असलेल्या युनिट IV मधील सुविधेचा विस्तार करण्यासाठी कंपनीच्या सिव्हिल वर्कसह भांडवली खर्चासाठी ८७.८६ कोटी रुपये; कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी १२२ कोटी रुपये आणि उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरण्यात येणार आहे.

मंगल इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज लिमिटेड ट्रान्सफॉर्मर घटकांवर प्रक्रिया करण्यात माहिर आहे, ज्यामध्ये ट्रान्सफॉर्मर लॅमिनेशन, CRGO स्लिट कॉइल्स, अमॉर्फस कोर, कॉइल आणि कोर असेंब्ली, वाउंड आणि टॉरॉइडल कोर आणि ऑइल-इमर्स्ड सर्किट ब्रेकर्स यांचा समावेश आहे. ते CRGO आणि CRNO कॉइल्स तसेच अमॉर्फस रिबन्सचा देखील व्यापार करते. याव्यतिरिक्त, कंपनी पॉवर इन्फ्रास्ट्रक्चर उद्योगासाठी ट्रान्सफॉर्मर आणि कस्टमाइज्ड उत्पादने तयार करते.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com


# एल्विश यादवच्या घरावर भाऊ गँगने केला गोळीबार

गुरुग्राम, दि. १७ वृत्तसंस्था

यूट्यूबर आणि बिग बॉस विजेता एल्विश यादव याच्या गुरुग्राममधील घराबाहेर रविवारी पहाटे गोळीबार करण्यात आला आहे. या गोळीबाराची जबाबदारी भाऊ गँगने घेतली असून सुमारे डझनभर गोळ्या त्याच्या घरावर झाडण्यात आल्या आहेत. याचे कारणही भाऊ गँगने सांगितले आहे.

बाइकवरून आलेल्या तीन अज्ञात लोकांनी घराजवळ थांबून सुमारे १० ते १२ गोळ्या झाडल्या होत्या. गोळीबारावेळी एल्विश घरात नव्हता, परंतू घरात त्याचा एक कर्मचारी आणि इतर काही लोक उपस्थित होते. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजवरून गुन्हेगारांचा माग काढण्यास सुरुवात केली आहे. आरोपींनी हेल्मेट घातलेले होते. यामुळे ओळख पटवणे कठीण झाले आहे.



एल्विश यादवच्या गुरुग्राममधील घरावर अंदाधुंद गोळीबार करण्यात आला त्याची जबाबबारी नीरज फरीदपूर आणि भाऊ रीतुलिया या गुंडांनी घेतली आहे. नीरज आणि भाऊ दोघेही गँगस्टर हिमांशू भाऊ टोळीशी संबंधित आहेत. या गँगला भाऊ गँग म्हणून ओळखले जाते. एल्विश यादवने एका बेटिंग ॲपची जाहिरात केली आहे. या बेटिंग ॲपने अनेक घरे उद्ध्वस्त केली आहेत. एल्विश यादव अशा ॲपची जाहिरात करत आहे. म्हणूनच त्याच्या घरी गोळीबार करण्यात आला आहे, असे या भाऊ गँगने सोशल मीडियावरील पोस्टवर म्हटले आहे. पोर्तुगालमध्ये राहणारा गुंड हिमांशू भाऊ भारतात ३० हून अधिक गुन्हेगारी आणि संघटित गुन्ह्यांमध्ये हवा आहे. हिमांशू भाऊचा गुन्हेगारी प्रवास १७ वर्षांचा होता. तो खून, खंडणी आणि हत्येचा प्रयत्न यासारख्या विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी होता. तो बनावट पासपोर्टवर भारतातून दुबईला पळून गेला आणि नंतर पोर्तुगालला स्थलांतरित झाला आहे.

# अमेरिकन पथकाचा भारत दौरा रद्द

## भारत-अमेरिका दरम्यानची व्यापार चर्चा रखडली

वॉशिंग्टन, दि. १७ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर्षी फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेचा दौरा करत व्यापार करारासाठी वाटाघाटी सुरू केली होती. त्यानंतर भारत आणि अमेरिकेत चर्चेच्या पाच फेऱ्या झाल्या होत्या. सहावी फेरी ऑगस्ट महिन्याच्या अखेरिस भारतात होणार होती. मात्र आता वॉशिंग्टन डीसीच्या अधिकाऱ्यांचा भारत दौरा अमेरिकेने सध्यासाठी थांबवला आहे. या करारावर लक्ष असलेल्या सूत्रांनी ही माहिती द इंडियन एक्सप्रेसला दिली आहे.



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय उत्पादनांवर ५० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. जागतिक स्तरावर कोणत्याही देशांपेक्षा हा सर्वाधिक टॅरिफ आहे. दरम्यान २५ टक्के टॅरिफ आधीच अमलात आलेले आहे. तर रशियाकडून तेल आयात करत असल्यामुळे अतिरिक्त २५ टक्के आणखी टॅरिफ लावला जाणार आहे. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भू-राजकीय घटना कशा घडतात, यावर हा निर्णय अवलंबून असेल.

# सीमाप्रश्नावर चर्चेसाठी चिनी परराष्ट्रमंत्री भारत दौऱ्यावर

नवी दिल्ली, दि. १७ वृत्तसंस्था

चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी सोमवार १८ ऑगस्टला भारताच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यावेळी भारत व चीनमधील सीमाप्रश्नावर दोन्ही देशांच्या विशेष प्रतिनिधींमधील चर्चेची २४वी फेरी होईल. त्यात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासोबत वांग यी बोलणी करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) वार्षिक परिषदेसाठी चीनच्या दौऱ्यावर या महिन्याच्या अखेरीस जाणार आहेत. त्याआधी ही घडामोड होत आहे. भारताच्या परराष्ट्र खात्याने म्हटले आहे की, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या निमंत्रणावरून, चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्युरोचे सदस्य आणि चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यावेळी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हेही वांग यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. डोवाल यांनी गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये चीनला भेट दिली होती आणि तेव्हा वांग यांच्यासोबत विशेष प्रतिनिधींची २३वी फेरी पार पडली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात रशियातील कझान शहरात दि. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी एक बैठक झाली. दोन्ही देशांतील संवाद पुन्हा सुरू करण्याचा निर्णय त्या बैठकीत झाला.


महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002. **Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**